
# पंतप्रधान
# लालबहादुर शास्त्री



डॉ. न. म.जोशी

# पंतप्रधान लालबहादुर शास्त्री

डॉ.न.म. जोशी

सुयोग प्रकाशन
पुणे

■ **पंतप्रधान लालबहादुर शास्त्री**
**Pantpradhan Lalbahadur Shastri**

■ **प्रकाशिका**
सौ.सुचेता राळे
९८६, सदाशिव पेठ, ज्ञानप्रबोधिनी रस्ता, तळ मजला
पुणे ४११ ०३०.
☎ (फॅक्स) : २४४९५५८४



■ **© डॉ.न.म. जोशी**



■ **प्रकाशन दिनांक :** जानेवारी २०११

■ **प्रकाशन क्रमांक :** ३१३

■ **अक्षर जुळणी**
दत्तात्रय एंटरप्रायझेस,
६१७, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.

■ **मुद्रक**
किरण प्रोसेस
शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

■ **मुखपृष्ठ**
श्री.राजेंद्र गिरीधारी

■ **मूल्य : रुपये चाळीस मात्र**

# १ : 'लाल' जन्मला

'काशीस जावे नित्य वदावे' ही ओळ आपल्या घराघरांतून सदैव कानावर पडते. काशीयात्रेला जाऊन आल्याशिवाय जन्माचं सार्थक नाही. भारतातले लोक काशीविश्वेश्वरांच्या दर्शनासाठी अष्टदिशांनी गोळा होतात. काशीच्या अशा या पुण्यपावन वातावरणातच राहण्याचा ज्यांना योग आला ते किती भाग्याचे! शारदाप्रसाद श्रीवास्तव हे या काशीच्या पुण्यमय परिसरातच राहत होते. काशीपासून अवघ्या सात मैलांवर असलेले एक खेडे मोगलसराई. श्री. शारदाप्रसाद हे साधे शिक्षक होते. तेही प्राथमिक शिक्षक होते. त्यांच्या पत्नीचे नाव होते रामदुलारी. संसार गरिबीचा होता. पण मनातच स्वर्ग फुललेला असला म्हणजे बाहेरील दारिद्र्याचे चटके फारसे जाणवत नाहीत. श्री. शारदाप्रसाद आणि रामदुलारी यांची कालमक्रमणा आनंदात चालली होती. आणि एके दिवशी त्यांच्या या मोहरलेल्या संसारवृक्षाला नवा अंकुर उगवला. १९०४ साल! ऑक्टोबर महिन्याचा दुसरा दिवस! वेळ पहाटेची. सर्वत्र सामसूम होती. आकाशावरला अंधाराचा पडदा विरळ होत जाणार होता. पण श्री. शारदाप्रसाद मात्र अस्वथ होते. या अस्वस्थेत चिंता नव्हती–औत्सुक्य होतं. अखेर श्री. शारदाप्रसादांच्या कानावर शब्द पडले. 'तुम्हाला मुलगा झाला'

श्री. शारदाप्रसाद आणि त्यांच्या पत्नी रामदुलारी यांच्या आनंदाला सीमा नव्हती. बाळ अगदी लहान होता पण मोठा चलाख! त्याचं नाव ठेवण्यात आलं 'लालबहादुर'. भारताचे माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री म्हणजेच श्री. शारदाप्रसादांचा हा बाल लालबहादुर होय. रामदुलारींना त्या वेळी कल्पना देखील नसेल की आपल्या कुशीला बिलगलेला हा इवलासा जीव पुढे भारतमातेचा मुकुटमणी होणार!

दिसामाशी 'लालबहादुर' वाढू लागला. रांगू लागला. रांगता रांगता एखादे पाऊल पुढे टाकून चालू लागला. श्री. शारदाप्रसाद एव्हाना छोटेसे

अंमलदार झाले होते. आपल्या मुलाच्या भविष्यकालाची सुंदर स्वप्ने त्यांनी मनी रंगवली होती. पण ही स्वप्नांची दुनिया परमेश्वराने एका कठोर प्रहाराने छिन्नभिन्न करून टाकली. चित्रगुप्ताच्या वहीतील त्यांच्या आयुष्याची नोंद पुरी झालेली होती. एक दिवस यमदूतांचा सांगावा आला. श्री. शारदाप्रसाद संसार अर्ध्यावरच टाकून निघून गेले. लालबहादुर त्या वेळी अवघे दीड वर्षांचे होते. आयुष्याच्या अगदी प्रभातकाळीच लालबहादुर पोरके झाले. रामदुलारीदेवींना तर आकाश कोसळल्यासारखे वाटू लागले. अवघ्या विसाव्या वर्षी रामदुलारींना वैधव्य आले होते.

आपल्या मुलीवर ओढवलेला हा घोर प्रसंग हजारीलाल यांनी-लालबहादुरांच्या आजोबांनी-पाणावलेल्या पण स्थितप्रज्ञ नेत्रांनी पाहिला आणि त्यांनी रामदुलारीला मुलासह आपल्याकडेच ठेवून घेतले. हजारीलाल यांचेही कुटुंब खूपच मोठे होते. त्या विस्तीर्ण वटवृक्षाच्या छायेला ही मंडळी सुखे नांदू लागली. आजोबांच्या प्रेमळ कृपाछत्राखाली लालबहादुर वाढत होते. दहाव्या वर्षापर्यंत ते आजोबांच्या घरी मोगलसराई येथेच होते. सहाव्या इयत्तेपर्यंत मोगलसराईतच त्यांचे शिक्षण झाले. त्यानंतर मात्र लालबहादुर यांना बनारसला पुढील शिक्षणासाठी पाठविण्यात आले. बनारसला रघुनाथप्रसाद यांच्याकडे ते राहत असत. लालबहादुरांचे मावसे रघुनाथप्रसाद हे संपन्न व्यक्तित्वाचे आणि कडक शिस्तीचे होते. बनारस नगरपालिकेत ते सरकारकून होते. ते गरीब होते पण आपल्या कुटुंबीयांना त्यांनी दिलेला गुणसंचय हा धनदौलतीहून श्रेष्ठ प्रतीचा होता.

बनारसच्या हरिश्चंद्र हायस्कूलमध्ये लालबहादुर यांचे नाव दाखल करण्यात आले. शालेय शिक्षणाबरोबरच घरगुती संस्कारांचा विलक्षण परिणाम लालबहादुरांच्या मनावर झाला. लालबहादुर हे स्वभावत:च संस्कारक्षम होते. रघुनाथप्रसाद यांची शिस्त आणि त्यांचे संपन्न चारित्र्य यांचा परिणाम लालबहादुरांच्या मनावर चांगल्या तऱ्हेने बसला.

लालबहादुरांना त्यांच्या घरात 'नन्हे' असे लाडके नाव होते. नन्हे आता

बराच मोठा झाला, वयाने. पण शरीराने मात्र तो खरोखरीच नन्हे राहिला. अर्थात पुढील आयुष्यात नन्हेच्या मनाने एवढा प्रचंड विकास केला की त्याच्या शरीराच्या खुजेपणाची जाणीव कधीच कोणाला झाली नाही. छोट्याशा कुपीत हजारो योजने दरवळणारा सुगंध राहू शकतो. लहानशा ठिणगीत प्रखर प्रकाशज्योत निर्माण करण्याचे सामर्थ्य असते. पर्वताच्या कुशीत उगम पावलेली करंगळीएवढी जलधारा पुढे महानदीचे स्वरूप प्राप्त करून घेते. 'लालबहादुर' हे यापैकीच एक ज्वलन्त उदाहरण आहे. म्हणूनच त्यांची मूर्ती लहान असली तरी त्यांची कृती महान आहे. त्यांच्या या उत्तर आयुष्यातील महान कृतींचा उगम त्यांच्या बनारसमधील वास्तव्यात आहे. भविष्यकाळात भरतखंडाचे नेतृत्व करणाऱ्या या नेत्याच्या गुणांचे बीजारोपण बनारसला, पवित्रक्षेत्री झाले.

■ ■ ■

# २ : भविष्याची वाटचाल

काशी हे धर्मपीठ असले तरी साहित्यकलांची सोबत काशीने चांगली जोपासली होती. काशीमध्ये त्या काळी अनेक कविसंमेलने भरत. उर्दू आणि हिंदी काव्याची बरसात होई. या रसकल्लोळांत भलाभल्या बहादरांबरोबर एक छोटीशी वामनमूर्तीही असे. अर्थात श्रोता म्हणून! कविसंमेलनांना उपस्थित राहावयाचे,चिंतन करावयाचे आणि स्वत:ही कवितांची रचना करावयाची असा काशीतील वास्तव्यात या छोट्या कवीचा परिपाठ होता. हा छोटा कवी म्हणजेच आपले लालबहादुर. त्यांची एक उर्दू कविता त्यांचे वर्गबंधू श्री. अलगुराय शास्त्री यांनी जपून ठेवली आहे ती अशी.

दाने अलग अलग हो तब भातका मजा है!
कोई नासूर शक है जिगरमें हो कि दिनमें हो!
बराबर खूं बहा जाता है मेरी चश्मे गिरियांसे!
तुम्हारे नामकी माला जपी जाती है देखो तो!
मुसलसल दाना हाएं अश्क मेरी चश्मे गिरियांसे

सरस्वतीच्या सहवासांत अशा तऱ्हेने रममाण होणारे लालबहादुर शाळेत एक उत्तम शिस्तप्रिय विद्यार्थी होते. शाळा चुकविणे हे त्यांना पाप वाटे. वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत या 'हरिश्चंद्र' हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. याच काळात भारतात गांधीयुग सुरू झाले होते. पहिले महायुद्ध संपले होते. ॲनी बेंझट यांनी होमरूल लीगची स्थापना करून भारतात नवे वारे निर्माण केले होते. गोऱ्या साहेबाच्या जुलूमजबरदस्तीला ऊत आला होता. गांधींजीचा सत्याग्रह समाजाने आत्मसात करीत आणला होता. असंतोषाची आग अंतरंगात धुमसत होती. वृत्तपत्रांचे रकाने या असंतोषाने भरलेले होते. युवकांच्या चळवळींनी उग्र रूप धारण केले होते. आणि गोऱ्यांच्या संगिनी अधिकच खळवत होत्या. या सर्व घटनांना सूक्ष्म अभ्यास

आणि त्यांचे सखोल चिंतन लालबहादुर शालेय आयुष्यापासूनच करीत होते.

या चिंतनशील प्रवृत्तींतूनच त्यांचे ज्वालाग्राही व्यक्तिमत्त्व तयार झाले. वास्तविक, शाळेमध्ये अत्यंत शांत, एकमार्गी, सच्छील विद्यार्थी म्हणून लालबहादुर ओळखले जात होते. पण याच वेळी या शांत सागराच्या पोटी प्रचंड वादळे निर्माण होत होती. याची वरून कुणालाच कल्पना येण्यासारखी नव्हती.

१९२१ साल! कुप्रसिद्ध रौलट ॲक्ट विरुद्ध गांधीजींनी चळवळ सुरू करण्याचे ठरविले. असहकाराचा प्रचंड होम देशभर पेटला. लक्षावधी तरुणांनी तनमनधन करून या होमात उडी घेतली. पदव्यांचा त्याग केला. शाळाकॉलेजांच्या इमारती ओस पाडल्या. विलायती मालाच्या होळ्यांच्या ज्वाला आकाश फाडू लागल्या. प्रचंड वादळाने हिमगिरीसुद्धा हलावा तसा या असहकाराने देश गदागदा हालून गेला. शास्त्रीजींच्या मनावर या सर्व घटनांचा विलक्षण परिणाम झाला. तथाकथित शालेय अभ्यासात त्यांचे मन रमेना. पुस्तकी ज्ञानाच्या कोळिष्टकांना झटकून जिवंत सागरांत उडी घेण्यास लालबहादुर सिद्ध झाले. अलगुराय शास्त्री आणि त्रिभुवन नारायणसिंह हे त्यांचे आणखी दोन सोबती त्यांच्या सांगाती आले. तिघांनी शाळेला रामराम ठोकला, आणि महात्म्याच्या चळवळीची वाट धरली.

परिणाम व्हायचा तोच झाला. लहानशीच पण शिक्षा झाली. जीवनाचा आतापर्यंतचा निर्वेध मार्ग संपला. भवितव्य केवळ अस्थिर झाले. लालबहादुरांच्या सर्व नातलगांना त्यांच्या शिक्षण त्यागामुळे धक्का बसला. आपला एकुलता एक मुलगा.....आधारस्तंभ.... अशा तऱ्हेने विचलित झाला असे त्या माउलीला वाटून तिने हाय खाल्ली. अनेकांनी सल्ला दिला. हा मार्ग विनाशकारी आहे. यात तू पडू नको. पण लालबहादुरांचा निर्णय म्हणजे वज्रलेप! त्यात तसूभरही फरक झालेला नव्हता.

लालबहादुरांचे मन असे पोलादी झाले त्याचे प्रमुख कारण त्यांचे शिक्षक

निष्कामेश्वर मिश्र. श्री.मिश्र हे नुसते 'तात्यापंतोजी' शिक्षक नव्हते. ते शिल्पकार होते. आपल्या विद्यार्थ्यांचे केवळ शिक्षक नव्हते. विभूती, गुरु, प्रेरक, मित्र, सल्लागार, हितचिंतक, तत्त्वज्ञानी अशा विविध रूपांनी त्यांचे तेजस्वी व्यक्तिमत्त्व विनटलेले होते. राष्ट्रीय कथांचे ज्वलंत भाषण त्यांनी केलेले कथन म्हणजे त्यांच्या विद्यार्थ्यांना एक प्रकारे आवाहनच होते. शालेय अभ्यासाबरोबरच वादविवाद, नाट्य, बालवीर चळवळ या बाबतीत ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत व स्वत: विद्यार्थ्यांच्या सहवासात राहत. महाभारतातील एका कथानकावर आधारलेल्या एका नाटकात लालबहादुरांनी कृपाचार्यांचे काम केले होते. कृपाचार्य हे महाभारत काळातील ज्येष्ठ मुत्सद्दी होते. वादविवादातही लालबहादुर आत्मीयतेने भाग घेत. अशा तऱ्हेने आपल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यात श्री. निष्कामेश्वर यांनी आपले सर्वस्व वेचले होते. त्यांचे हे श्रम त्यांच्या विद्यार्थ्यांनी कारणी लावले.

भाषा आणि इतिहास हे लालबहादुरांचे आवडते विषय. त्यांचे इंग्रजी उच्चारही सफाईदार असत. शाळेत असताना दिपोटींनी त्यांच्या इंग्रजी उच्चारांबद्दल त्यांची पाठ थोपटली होती. या सर्व गोष्टींचा पुढील आयुष्यात लालबहादुरांना फार उपयोग झाला.

चळवळीत उडी घेण्यासाठी त्यांनी शाळा सोडली, तेव्हा इतर विद्यार्थ्यांचा त्यांच्या भोवती गराडा पडला. त्यांच्या वक्तृवाने यांचे चिमुकले सहकारी भारावून गेले. गांधीजींप्रमाणेच लो. टिळक हे शास्त्रीजींचे दैवत होते. त्यांच्या कुमार मनाला पहिले आवाहन लोकमान्यांनीच केले होते. लोकमान्य एकदा बनारसला आले होते. शास्त्रीजी त्या वेळी बनारसपासून पन्नास मैल दूर होते. लोकमान्यांना पाहण्याची व त्यांचे भाषण ऐकण्याची अनिवार इच्छा होती, पण रेल्वेगाड्यापुरतेही पैसे नव्हते. हरप्रयत्नांनी दुसऱ्याकडून उसने पैसे घेऊन लालबहादुर बनारसला गेले. लोकमान्यांचे भाषण त्यांनी ऐकले.

लोकमान्यांची ती धीरगंभीर मूर्ती, लोकमान्यांचे शब्द यांचा शास्त्रीजींच्या मनावर सखोल परिणाम झाला. या सभेत लोकमान्य म्हणाले होते, 'आपल्या शत्रूची अडचण हीच आपली संधी' या वाक्याची कितीतरी पारायणे करीत लालबहादुर घरी परतले.

अशा तऱ्हेने भविष्यातील नेतृत्वाची भरभक्कम पूर्वतयारी लालबहादुरांनी बालवयात, कुमारवयातच केली होती. कुमारवयातील घोर तपस्येचे फल त्यांना उत्तर आयुष्यात मिळाले. पण त्यासाठी त्यांना जबर किंमत द्यावी लागली. अनिश्चित आयुष्य जगावे लागले. दारिद्र्याचे चटके सोसावे लागले आणि अनेक लहानमोठ्या संकटांशी खंबीरपणे झुंज द्यावी लागली.

■ ■ ■

# ३ : लालबहादुर 'शास्त्री' झाले

बेकायदा ठरवलेल्या सभेत व मिरवणुकीत भाग घेतल्याबद्दल लालबहादुर यांना अटक करून कारावासात ठेवण्यात आले. स्वदेश-भक्तीच्या मार्गावर टाकलेले पहिलेच पाउल पडले ते कारावासात!

१९२१ च्या अखेरीस तुरुंगवासातून त्यांची मुक्तता झाली. जुनी शाळा आता सुटलीच होती. शिक्षण घेणे तर आवश्यक होते. लालबहादुरांची पावले साहजिकच काशी विद्यापीठाकडे वळली.

काशी विद्यापीठ ही राष्ट्रीय शिक्षण देणारी संस्था होती. राष्ट्रीय वृत्तीच्या शिक्षणतज्ज्ञांनी तिची स्थापना केली होती. प्रसिद्ध तत्त्वज्ञ डॉ. भगवानदास त्या वेळी काशी विद्यापीठाचे प्राचार्य होते. त्यागमय वृत्तीचे अनेक सत्त्वशील प्रज्ञावंत या विद्यापीठात अध्यायनाचे कार्य करीत. आचार्य नरेंद्र देव, डॉ. संपूर्णानंद, आचार्य कृपलानी, श्री. श्रीप्रकाश ही विद्वनांची मालिका काशी विद्यापीठाकडे होती. या विद्यापीठांतील शिक्षण इतर विद्यापीठांप्रमाणे पुस्तकी थाटाचे नव्हते. येथील शिक्षणाचा हेतूच भिन्न होता. अभ्यासकांमध्ये प्रखर राष्ट्रवादाची निर्मिती करणे आणि त्यातून राष्ट्राचा उत्कर्ष साधणे हे काशी विद्यापीठाच्या शिक्षणदानाचे उद्दिष्ट होते.

काशी विद्यापीठ हा त्या काळातील जणू सांदीपनींचा आश्रम होता. लालबहादुरांना ऋषितुल्य प्राध्यापकांचा सहवास घडला. तसाच तेजस्वी व ज्ञानपिपासू मित्रांचा लाभ झाला. अलगुराय शास्त्री, हरिहरनाथ शास्त्री, बाळकृष्ण केसकर, त्रिभुवन नारायण सिंग, विभूती मिश्र, राजाराम शास्त्री, हे नामवंत लोक त्यांचे सहकारी होते. ज्ञान आणि अनुभव यांचे मनोहारी मिलन म्हणजे काशी विद्यापीठ! तेथील ज्ञानसाधना साक्षात्कारी होती. प्रत्ययकारी होती. लालबहादुरांच्या कर्तृत्ववान जीवनाचे तत्त्वज्ञान येथेच रूपाला आले. डॉ. भगवानदास यांच्या समन्वयवादी विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावर झाला. डॉ. भगवानदास यांच्या विषयी लालबहादुर म्हणतात,

“साधे आचरण, रसज्ञ सौंदर्यदृष्टी, श्रेष्ठ अभिरुची ही डॉ. भगवानदास यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती”. समन्वयवाद हा तर डॉ. भगवानदास यांच्या विचारसरणीचा विशेष. याच विचारप्रणालीचा लालबहादुरांवर प्रकर्षाने परिणाम झाला. भविष्यकाळात तणातणीच्या राजकारणात विरोधी मतप्रणालींना तोंड देण्याचे अनेक प्रसंग आले. पण लालबहादुरांनी मोठ्या कौशल्याने आणि खुबीने अनेक ठिकाणी समेट घडविले. विद्यार्थिदशेत अभ्यासिलेला आणि आत्मसात केलेला समन्वय त्यांना आयुष्यभर साथ देत राहिला. राजकीय वर्तुळात जेथे मतामतांच्या फैरी झडतात, कोठल्या तरी तत्त्वासाठी रणे माजतात अशा ठिकाणीही एकांतिक मते न बाळगणारा एकमेव समन्वयवादी म्हणून लालबहादुर यांचे नाव घेतले जाते.

अशा रीतीने काशी विद्यापीठांत जीवनाचे खरेखुरे शिक्षण घेऊन लालबहादुर काशी विद्यापीठाचे स्नातक झाले. या स्नातकाची पदवी होती ‘शास्त्री’. आज अवघे जग लालबहादुरांना ‘शास्त्री’ या नावाने ओळखते. पण ते त्यांचे आडनाव नसून त्यांची पदवी आहे. उपाधी आहे. या पदवीच्या निमित्ताने, राष्ट्रीय सेवाव्रताची खूण म्हणून त्यांना ‘शास्त्री’ ही उपाधी चिकटली आणि ‘लालबहादुर श्रीवास्तव’ चे ‘लालबहादुर शास्त्री’ झाले. काशी विद्यापीठाचा हा ‘शास्त्री’ मिळमिळीत तत्त्ववेत्ता नसून खंबीर शास्त्रवेत्ता आहे हे आता सर्वविख्यात आहे.

■ ■ ■

# ४ : सप्तपदी

१९२६ मध्ये शास्त्रींजींचा काशी विद्यापीठातील अभ्यास संपला. आयुष्याचा ठरावीक चाकोरीचा मार्ग त्यांना कधीच पसंत नव्हता. आतापर्यंत जोपासलेल्या विचारानुरूप आचरण करण्याची अमर्याद इच्छा होती. ह्या आंतरिक ऊर्मीमुळेच विद्यापीठातून बाहेर पडताच शास्त्रीजी 'पीपल्स ऑफ दि सर्व्हंट्स सोसायटी' या संस्थेचे आजीव सेवक झाले. लाला लजपतराय यांनी १९२१ मध्येच या संस्थेची स्थापना केली होती. 'राष्ट्रकार्यासाठी मिशनरी वृत्तीचे सेवातत्पर कार्यकर्ते निर्माण करणे' हे या संस्थेचे उद्दिष्ट होते. या शिवाय देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याचे कार्य या संस्थेला करावयाचे होते.

या संस्थेचा आजीव सेवक होणे म्हणजे जाणून बुजून आगीत उडी घेण्यासारखेच होते. कारण येथे मिळणारे सेवावेतन म्हणजे किमान साठ रुपये व कमाल शंभर रुपये. शिवाय प्रत्येक सभासदाने किमान वीस वर्षे तरी सेवा केली पाहिजे अशी अट होती. सभासदांचे वैयक्तिक जीवन निष्कलंक असले पाहिजे असा खणखणीत इशारा होता. या संस्थेच्या सेवकाजवळ स्वार्थाचा लवलेशही असता कामा नये असा अलिखित करार होता. व्यावहरिक दृष्ट्या ही म्हणजे यज्ञवेदी होती. सदैव चटके देणारी पण लालबहादुरांनी यत्किंचितही विचार न करता ही सेवावृत्ती पत्करली आणि अशा तऱ्हेने राष्ट्रकार्याची नांदी झाली.

प्रथमतः मुजफरनगर येथे हरिजनोद्धाराचे काम त्यांना देण्यात आले. नंतर अलाहाबाद येथे बाबु पुरुषोत्तमदास टंडन यांच्या बरोबर ते कार्य करू लागले. लालबहादुर शास्त्री झाले. या संस्थेचे अध्यक्ष आहेत. 'लोकसेवा या संज्ञेचा खरा अर्थ मला या संस्थेने शिकवला' असे लालबहादुर म्हणत. सेवकांनी मिळेल ते काम करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे सुरुवातीची

दहा वर्षे कायदेमंडळाच्या निवडणुकांना उभे राहण्याची मनाई होती. अशा तऱ्हेने 'निर्वेध लोकसेवा' हे एकच उद्दिष्ट संस्थेने डोळ्यासमोर ठेवलेले होते. लालबहादुर संस्थेच्या या उद्दिष्टाबरोबर सदैव प्रामाणिक राहिले.

१९२७ साल ! लालबहादुरांच्या घरी त्यांच्या विवाहाबाबत माजघरा-स्वयंपाकघरात चर्चा होऊ लागली. लालबहादुरांचे घराणे जुन्या पद्धतीचा वारसा घेऊन जगणारे होते. मुलाचा विवाह लवकर झालाच पाहिजे हा सूर दिसू लागला. लालबहादुरांनी हा सूर बेसूर केला नाही. त्यांनी संमती देऊन टाकली. मिर्झापूरच्या एका कुलीन घराण्यातील एक मुलगी सांगून आली. ललितादेवी तिचे नाव. लालबहादुर आणि ललितादेवी एका सुमुहूर्तावर विवाहबद्ध झाले. ही सप्तपदी आता दोघांनाही एकाच मार्गावर नेणारी होती. सुखदु:खाचा वाटा दोघांनीही उचलावयाचा होता. येणाऱ्या संकटांना तोंड दोघांनी द्यावयाचे होते आणि सुखाचे क्षणही दोघांनी मिळून वेचायचे होते.

ललितादेवींनी आपली सप्तपदी भविष्यकाळात फारच चांगल्या तऱ्हेने यशस्वी करून दाखवली. जीवनात लालबहादुरांना हरघडी साथ दिली. संकटांतही प्रोत्साहन दिले. आपत्काली त्यांचे शुभचिंतन केले. या गृहलक्ष्मीने लालबहादुरांचा धगधगता संसार आपल्या सौम्य पण निश्चयी वृत्तीने काटेकोरपणे सांभाळला. आणि गृहजीवनातील उणिवांची जाणीव शास्त्रीजींना कधीही होऊ दिली नाही. लालबहादुरांचा ललितादेवींबरोबर झालेला विवाह हे लालबहादुरांच्या साधेपणाचे ठळक द्योतक होय. लालबहादुरांचे सासरे-ललितादेवींचे वडील - त्यांना हवा तेवढा हुंडा देण्यास तयार होते. पण लालबहादुरांनी रुपयांच्या नकली किमतीत मोजला जाणारा हा सौदा साफ नाकारला. त्यांनी हुंडा मागितला पण कोणता ? काही वार खादी व एक चरखा ! असा जगावेगळा हुंडा घेणारा हा जगावेगळा नवरदेव होता !

गृहजीवनातील ही सप्तपदी आटोपते तोच राजकीय जीवनातील

लालबहादुरांची कायमची जन्मगाठ बांधली गेली. १९२८ मध्ये लाला लजपतराय यांचे निधन झाले. पुरुषोत्तमदास टंडन लोकसेवक मंडळाचे अध्यक्ष झाले. संस्थेचे मुख्य कार्यालय अलाहाबादेस ठेवण्याचे निश्चित झाले. अर्थातच लालबहादुरही कायमचे अलाहाबादेस राहण्यास आले. हाच त्यांचा सार्वजनिक कार्याचा श्रीगणेशा! या ठिकाणी लोकसेवक मंडळाच्या कार्याबरोबरच लालबहादुर काँग्रेस संघटनेत काम करू लागले. तेथील महत्त्वाच्या पदावर काम करण्याची त्यांना संधी मिळाली. अलाहाबाद जिल्हा काँग्रेस समितीचे चिटणीस म्हणून शास्त्रींची नियुक्ती झाली.

१९३० साल उजाडले. २६ जानेवारी १९३० रोजी भारतीय जनतेने संपूर्ण स्वातंत्र्याची शपथ घेतली. महात्माजींनी कायदेभंगाची प्रखर चळवळ सुरू करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. महात्माजींनी साहेबाला पूर्वसूचना दिली आणि १२ मार्च १९३० रोजी चळवळीची पहिली ज्वाला भडकली. देशभर वणवा पेटला. या चळवळीची अलाहाबाद आघाडी लालबहादुर यांनी सांभाळली. अलाहाबादजवळच्या एका खेड्यात त्यांनी या मोहिमेचा नारळ फोडला. 'सरकारला सारा देऊ नका' अशा आशयाचे एक ठणठणीत भाषण त्यांनी ठोकले. अर्थातच त्यांना अटक करण्यात आली. अडीच वर्षांची शिक्षा झाली.

या शिक्षेचे त्यांनी स्वागतच केले. त्यांचे मन कचरले नाही किंवा माघारही घेतली नाही. घरातूनही त्यांना विरोध झाला नाही. नापसंतीही व्यक्त केली गेली नाही. ज्या वयात संसाराच्या फुलबागेत मुक्तपणे संचार करून सहचारिणीसमवेत आनंद लुटावा. त्याच वयात लालबहादुर बंदिवासाची वाटचाल करीत होते. ज्या वयात सुखलोप आयुष्यासाठी धन जोडावयाचे, त्या वयात त्यांच्या पदरी केवळ हालअपेष्टा आलेल्या होत्या. नव्हे! त्यांनी त्या हालअपेष्टांना सांगावाच धाडला होता. अशा अनिश्चित, आंदोलित अवस्थेत ललितादेवींची–त्या गृहस्वामिनीची काय

अवस्था झाली असेल याची कल्पना खऱ्या गृहिणीलाच येऊ शकेल! पण या साऱ्या काट्याकुट्यांचा मार्ग दोघांनीही हसतखेळत तुडविला. स्वत: लालबहादुरांना तर दारिद्र्याची लहानपणापासूनच सोबत होती. बनारसला कॉलेजमध्ये असताना घरून रोज सहासात मैल पायी जावे लागे. खूप वेळ तर जातच होता, पण श्रमही भरपूर होत होते. कधीकधी सकाळ-दुपार वर्ग असत. दुपारी घरी जेवायला यावे तर पंधरा-सोळा मैलांची चाल होई. सायकल घेणे शक्य नव्हते. अशा अपरिमित कष्टांचे लालबहादुरांना बाळकडूच होते. अशा अपरिचित कष्टांच्या वाटचालीत ललितादेवींनी त्यांना बिनतक्रार साथ दिली. सप्तपदीच्या वेळी जो मंत्रोच्चार होतो त्यांचे प्रत्यक्ष आचरण केले. आणि पतीच्या आयुष्याला आकार आणण्यासाठी निरंतर कष्टांसोबत मूक आनंदाने सहन केली.

■ ■ ■

# ५ : सच्चा सैनिक

१९३० पासून लालबहादुरांनी काँग्रेसची पताका खांद्यावर घेतली. नुसती घेतली नाही तर निष्ठेने सांभाळली. काँग्रेसच्या आणि पर्यायाने देशाच्या सेवेस त्यांनी स्वत:ला वाहून घेतले. १९३० ते १९३६ पर्यंत अलाहाबाद जिल्हा काँग्रेस समितीचे ते अध्यक्ष होते. त्या काळातील कायदेमंडळातील व इतर सर्व महत्त्वाच्या निवडणुकांमधले लालबहादुर यांच्या संघटनाकौशल्याचे आणि प्रचाराचे एक आगळेच स्वरूप दिसून आले. याच काळात मोठमोठ्या काँग्रेस-पुढाऱ्यांचा आणि त्यांचा विशेष परिचय झाला. पं.नेहरू आणि पुरुषोत्तमदास टंडन यांच्यासारख्या नेत्यांचा विश्वास शास्त्रीजींनी संपादन केला.

मात्र या सर्व गोष्टी करताना त्यांनी तथाकथित डावपेचांचा अवलंब कधीच केला नाही. निर्मल चारित्र्य आणि आपल्या कार्यावरील प्रामाणिक निष्ठा हेच त्यांच्या विश्वास संपादनाचे गमक. काँग्रेसमधील संघटनेत अत्यंत आत्मीयतेने काम करताना त्यांनी काही पथ्ये पाळली. झगमगीत प्रसिद्धीपासून ते नेहमीच दूर राहिले. गाजावाजा न करता आपले काम अत्यंत कसोशीने, नेकीने सांभाळणारा आणि सोपविलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडणारा सच्चा सैनिक असेच त्यांचे वर्णन करावे लागले.

पक्ष म्हटला म्हणजे भांडणे आली. सार्वजनिक कार्य म्हटले की मतभिन्नता आली. गटबाजी तर सर्वत्र असते. अशा वेळी खऱ्या संघटकाला तारेवरची कसरत करावी लागते. विभिन्न मताच्या व वृत्तीच्या लोकांना एकत्र आणून कार्यशकट मार्गस्थ ठेवणे ही केवळ कुशलतेची बाब! लालबहादुर याही कसोटीला पूर्णपणे उतरले. भांडखोर गटांना एकत्र आणून, सामोपचाराने तंटा मिटवण्यात त्यांचा हातखंडा होता. काँग्रेस संघटनेतील सामोपचार तज्ज्ञ म्हणून लालबहादुर ओळखले जाऊ लागले.

काँग्रेस संघटनेतील ही तात्कालिक फाटाफूट बुजविणे, संघटन करणे

याबरोबर काँग्रेसच्या सर्व चळवळीत त्यांनी सैनिकांच्या आवेशाने भाग घेऊन त्याही आघाडीवर पराक्रम केला. १९३० ते १९४५ पर्यंत त्यांचे एक पाऊल घरात एक तुरुंगात अशी त्यांची स्थिती होती. या मुदतीत त्यांना एकूण सात वेळा शिक्षा झाल्या. जीवनातील ऐन उमेदीची एकूण नऊ वर्षे कारागृहाच्या सहवासात गेली. १९३७ च्या कायदेमंडळाच्या निवडणुकीत लालबहादुर उत्तर प्रदेशच्या कायदेमंडळात निवडून आले. १९४६ सालीही ते पुन्हा निवडून आले.

१९४२ सालचे देशव्यापी आंदोलन हे शास्त्रीजींच्या जीवनातील महत्त्वाचे पर्व होते. भारतभर वातावरण तंग होते. ८ ऑगस्ट १९४२ रोजी 'छोडो भारत' हा क्रांतिकारक ठराव मंजूर झाला. स्वातंत्र्यसंवेदनेला एक वेगळेच तेजस्वी रूप आले. हजारो तरुणांनी '४२' चा होम आपल्या अभूतपूर्व त्यागाने प्रज्वलित केला. देश नखशिखान्त खळवळून निघाला. ९ ऑगस्ट १९४२ रोजी पहाटे ४ वाजता महात्माजींना अटक करण्यात आली. पण नुसत्या महात्माजींना पकडून साहेबांचे समाधान झाले नाही. काँग्रेसच्या सर्व रथी-महारथींना अटक झाली. एक खास आगगाडी या देशभक्त बंदिवानांनी भरून गेली. या धरपकडीतून सुटलेले काँग्रेसचे सेवक भूमिगत झाले. लालबहादुरांना अटक झालेली नव्हती. ते आपल्या सहकाऱ्यांसमवेत अलाहाबादकडे निघाले. नैनी स्टेशनावर सावधगिरीने उतरले. पोलिसांच्या हाती सापडू नये म्हणून फलाटावर उतरण्याऐवजी मागल्या बाजून रेल्वेरुळांवरून ते स्टेशनबाहेर पडले. आणि लगेच 'दत्त दिगंबर' सारखे गुप्त झाले. पं.नेहरू यांच्या आनंद भुवनात अगदी वरच्या मजल्यावर त्यांचा मुक्काम असे. या ठिकाणी एक छापखाना उभारण्यात आला होता. भूमिगत कार्यकर्त्यांसाठी आदेश देणारी, काँग्रेसच्या कार्याला गुप्तपणे मार्गदर्शन करणारी हजारो पत्रके या ठिकाणी छापली जात असत. या छापखान्याचे संचालन, पत्रकांच्या वाटपाची बिनचूक पण अत्यंत गुप्त व्यवस्था या सर्व गोष्टी लालबहादुरांकडे सोपविण्यात आल्या होत्या.

हा अज्ञातवास इतका धोकादायक होता की, सावधगिरीला जरा कुठे फट पडली असती तर सारा खेळ खलास होणार होता. कराल कारागृहाच्या भिंती आ वासून तयार होत्याच. पण लालबहादुरांनी हे कार्य इतक्या शिताफीने चालू ठेवले की इरसाल गुप्तचरांनाही आश्चर्य करावे. पण अखेर आनंद भुवनावर पोलिसांची धाड आलीच. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांना अटक करून मामुली झडती घेऊन पोलिस चालते झाले. पण लालबहादुरांनी आपली व्यवस्था अगदी चोख ठेवली होती. अत्यंत महत्त्वाचे कागदपत्रांचे कपटे करून ते शौचकूपात फेकून दिले. आनंद भुवनातले संकट केवळ दैवयोगाने टळले तरी पण खबरदारी म्हणून लालबहादुरांनी आपले बस्तान तेथून उठविले आणि केशवदेव मालवीय यांच्याकडे हा स्वातंत्र्य सैनिक अज्ञातवासी होऊन राहिला. इतर सर्व नेते तुरुंगात असल्यामुळे शास्त्रीजींच्या या कार्याला विशेष महत्त्व होते.

■ ■ ■

# ६ : कारावासातील कार्य

आपल्या कर्तृत्ववान आयुष्याची नऊ वर्षे लालबहादुरांनी तुरुंगाच्या गजाआड घालविली. अर्थातच या ठिकाणी ते नेहमीप्रमाणे कार्यमग्न राहिले. आळसाची संगत त्यांनी कधीही धरली नाही. त्या वेळी ब्रिटिशांचा तुरुंग हे अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांचे अध्ययन केंद्र झाले होते. आतापर्यंतचा इतिहास आपण पाहिला तरी तो हेच सांगतो. जगातील उत्कृष्ट ग्रंथांची निर्मिती कारागृहातून झालेली आहे. लो. टिळकांनी आपले 'गीतारहस्य' बंदिशालेतच लिहिले. लालबहादुरांनीही बंदिशालेची अध्ययनशाला करून टाकली होती. अवती भोवतीच्या, अनेक कार्यकर्त्यांसमवेत अथवा एकटे ते सदैव अभ्यास करीत. ते म्हणत, "राजकीय चळवळीत पदार्पण केल्यानंतर प्रत्येक वेळी मला तुरुंगवास घडला. पण अनेक दृष्टींनी मला त्याचा फायदा झाला. तुरुंगात माझे कितीतरी वाचन झाले."

लालबहादुरांची तुरुंगातील वर्तणूक हा तुरुंगाधिकाऱ्यांचाही कौतुकाचा विषय होता. 'एक आदर्श बंदी' या नात्याने सर्व जण त्यांना ओळखत. शिस्त आणि नीटनेटकेपणा यांचे काटेकोर पालन त्यांनी तुरुंगात सुद्धा सोडले नव्हते. देशाच्या निरनिराळ्या भागांतून निरनिराळ्या प्रवृत्तीचे लोक सत्याग्रहाच्या निमित्ताने तुरुंगात येत. त्यांच्यात आपापसांत तक्रारी होत. पण अशा लोकांवर लालबहादुर यांचा विलक्षण वचक होता. ते विलक्षण खुबीने पण खेळीमेळीने इतर कैद्यांना पटवून देत, 'राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी लढत असताना हे किरकोळ हेवेदावे, मत्सर सोडून द्यावेत. वाचन करावे, खेळ खेळावेत आणि तुरुंगातील आपले दिवस शांततेने पण समाधानाने घालवावेत. तरच आपण आपल्या स्वातंत्र्याच्या ध्येयाप्रत लवकर पोहोचू."

बंदी म्हणजे जगाच्या चारी वाटा बंद असलेला माणूस! अर्थातच त्याला मग साध्यासुध्या गोष्टींसाठी तुरुंगातल्या अधिकाऱ्याची याचना करावी लागते. त्या वेळी विशेषत: काही राजकीय बंदी विड्या, अन्न

वगैरेसाठी अधिकाऱ्याची याचना करीत पण लालबहादुरांना हे तोंड वेंगाडणे मुळीच पसंत नव्हते. आपल्या गरजाच अगदी कमीतकमी ठेवल्या होत्या. त्या मुळे आपल्या सहकाऱ्यांसमवेत मिळेल त्यात समाधानाने त्यांना राहता येत होते. तुरुंगातही त्यांचा जीवनक्रम कसा रेखीव होता! झोप, जेवण, व्यायाम, प्रार्थना आणि अभ्यास या गोष्ट अगदी वक्तशीरपणे करण्याकडे त्यांचा कटाक्ष होता. त्यांचे इतर सहबंदी त्यांच्या या नियमबद्ध जीवनांचे आश्यर्च करीत. आणि लाजत लाजत आपणही तसे वागण्याचा प्रयत्न करीत.

तुरुंगात असताना लालबहादुरांनी विपुल वाचन केले. मार्क्स व लेनिन यांच्या कम्युनिस्ट तत्त्वज्ञानावर अनेक पुस्तके त्यांनी वाचली व कम्युनिस्ट तत्त्वज्ञानांचा परिचय करून घेतला. त्याचप्रमाणे बरट्रांड रसेल, हॅरॉल्ड लास्की, हेगेल, कांट, हक्सले यांचे ग्रंथ वाचून त्यांचे परिशीलन केले. मॅडम क्यूरी यांच्या इंग्रजी चारित्र्याचा हिन्दी अनुवाद या तुरुंगवासाच्या काळातच त्यांनी केला. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीवर एक विस्तृत ग्रंथ लिहिण्याचा संकल्प त्यांनी तुरुंगवासातच केला. त्याप्रमाणे तीनशे पाने लिहूनही झाली नंतर मात्र वेळेच्या अभावी तो ग्रंथ पूर्ण होऊ शकला नाही. लेखनाला उपयुक्त अशी ऐषारामी साधने व वातावरण तुरुंगात असणे शक्यच नाही. टेबलखुर्ची कुठली नि विजेचा दिवा कुठला. पण असे असतानाही अंतरीच्या ज्योतीचा प्रकाश कारागृहाच्या अंधाऱ्या भिंतींनाही उजाळून टाकतो. म्हणूनच साहित्य निर्माण होते, विचार अंकुरतात, लालबहादुरांचे तुरुंगातले वाचन असेच होई, एखाद्या हठयोग्याप्रमाणे. तिथला दिवा कसा होता ठाऊक आहे! एरंडेल तेलात कापडाची चिंधी भिजवून ती वात पेटविली की झाला दिवा तयार. पण याच दिव्याचा प्रकाश तळमळीच्या अभ्यासकाला लाख सुवर्ण दीपांहूनही प्रकाशमान ठरतो. याच दिव्याच्या प्रकाशात लालबहादुरांनी 'टॉल-स्टॉय' वाचून काढला. ॲना कॅरेनिना ही प्रसिद्ध कादंबरी अशाच प्रकाशात वाचली.

क्वचित केव्हा केव्हा कोठीवरला पहारेकरी ओरडे, पुन्हा सारे शांत. वाचन सुरू. अशा तऱ्हेने लालबहादुरांचा तुरुंगवास त्यांना उपयुक्त ठरला. त्यांची विचारभूमी संपन्न झाली, परिपक्व झाली. त्यांच्या चिंतनशील मनाने तुरुंगवासात भरपूर कार्य केले. आणि मुशीतून आलेल्या सुवर्णाप्रमाणे त्यांच्या विचारांना एक आगळाच उजाळा मिळाला.

रात्र ग्रंथाच्या सहवासात घालविली तरी एरवीचा वेळ इतर अनेक गोष्टी करण्याकडे ते घालवित. अलाहबादेच्या तुरुंगात तर शास्त्रीजी बँडमिंटन खेळत असत. या वेळी पंडित नेहरू त्यांच्या बरोबर होते. व्हॉलिबॉल या खेळातही लालबहादुर मनसोक्तपणे भाग घेत असत. अलाहबादच्या तुरुंगात तर भारताचे हे दोन ज्येष्ठ नेते - पं. नेहरू व शास्त्री-आमने सामने एकमेकांविरुद्ध खेळले. लालबहादुर व ॲंग्लो इंडियन कैदी विरुद्ध पं नेहरू व जेलर असा बँडमिंटनचा सामना झाला आणि लालबहादुरांनी तो सामना अगदी सहजपणे जिंकला.

कारावासात असतानाच कौटुंबिक आपत्तींचीही त्यांच्यावर नजर वळली होती. आणि त्यांच्यापुढे अनेक कसोटीचे क्षण ठाकले होते. नैनीच्या तुरुंगात असताना त्यांची लाडकी कन्या 'मंजू' आजारी असल्याची वार्ता आली. लालबहादुर तुरुंगात-घरात मुलगी आजारी. तोही आजार साधासुधा नव्हे, विषमज्वर. मंजूला औषधोपचार नीट होऊ शकले नाहीत. लालबहादुरांना मुलगी अस्वस्थ असल्याचे कळले. पण तुरुंगातून बाहेर येण्यासाठी सरकारला हमीपत्र लिहून द्यावे लागणार होते की, 'यापुढे मुक्ततेच्या काळात काँग्रेसच्या कोणत्याही चळवळीत भाग घेणार नाही' असे हमीपत्र देणे म्हणजे आत्मवंचना होती. म्हणून लालबहादुरांनी तो विचारच दूर केला. अखेर जेलरनेच त्यांची मुक्तता केली. लालबहादुर घाईगर्दीने आपल्या रुग्ण कन्येला भेटण्यासाठी आले. आपले पितृत्व पणाला लावून त्यांनी धाव घेतली.पण छे! दैवाने आपला कार्यभाग केव्हाच उरकला होता. मुलीला भेटण्यासाठी आलेल्या पित्याला मुलीचे अंत्यसंस्कार करावे

लागले. सारे शास्त्री कुटुंब या घटनेने शोकविव्हल झाले. लालबहादुरांना तर वर्मी घाव बसला. पण कमालीच्या स्थितप्रज्ञतेने त्यांनी हा दुःखाचा डोंगर गिळला आणि शांतपणे, मुदत संपण्याची वाट न पाहता ते पुन्हा तुरुंगाकडे गेले.

ही आपत्ती पचवतात तोच आणखी एक तसेच संकट उभे राहिले. कसंबसं वर्ष लोटले असेल. लालबहादुरांचा चार वर्षांचा मुलगा आजारी पडला. तोही विषमज्वरानेच. मुलाला १०४ अंश ताप आहे अशी वार्ता त्यांना कळविण्यात आली आणि त्यांची एक आठवड्यासाठी बिनशर्त मुक्तता करण्यात आली. लालबहादुर घरी आले. आठवडाभर आजारी मुलाच्या सहवासात राहून आपल्या पितृत्वाचे पांघरूण त्याला देऊ केले. मुदत संपली. आठवडा भरला. लालबहादुर पुन्हा तुरुंगाकडे निघाले. पण त्याच सुमारास मुलाचा ताप आणखी वाढला. तपमान १०६ अंशांवर गेले. रजेची मुदत वाढवावी अशी विनंती करताच तुरुंगाधिकाऱ्यांनी लेखी हमीपत्राचा आग्रह धरला. लालबहादुरांनी अर्थातच स्पष्ट नकार दिला. कठोर मन करून ते तुरुंगात जाण्यास निघाले. आपल्या मुलाकडे एकवार डोळेभर पाहिले. हृदयाचा बांध फुटला होता. कर्तव्य का प्रेम ही शृगांपत्ति खडी होती. वाहणाऱ्या आसवांना तेथेच रोखून, वात्सल्याचा उमाळा येणाऱ्या काळजाला भक्कम पोलादी आवरण घालून लालबहादुर निघाले. मुलाने हट्ट धरला 'बाबा, नका ना जाऊ'' क्षणकाल हा मेरू विचलित झाला. पण क्षणकालच. कर्तव्यासाठी त्यांनी प्रेमाकडे पाठ फिरवली. मोहाला दूर सारले. मुलगी विष्मज्वराने गेलेली. औषधपाण्याविना तिचे हाल झाले होते ही गोष्ट प्रस्तुत प्रसंगात मनाला अनंत डागण्या देत होती. परंतु या ठिकाणी अशा विचारांना वावच नव्हता. ती वेळ तर ऐन धामधुमीची होती आणि म्हणूनच वात्सल्याची वल्कले कठोरपणे दूर करून, कर्तव्याची खरमरीत व्याघ्रांबरे धारण करून हा तपस्वी पुनः एकदा आपल्या तपोधामाकडे-तुरुंगाकडे-निघून गेला. या वेळी त्याच्या मनाला ज्या वेदना

झाल्या असतील त्यांची कल्पना केवळ एखादा पिताच करू जाणे!

अशा सर्व गोष्टी विचारात घेता. आपणाला असे म्हणावे लागेल की आपला कारावास लालबहादुरांनी वाया जाऊ दिला नाही. भविष्यकाळात जे भक्कम आणि भरीव कार्य त्यांना करावयाचे होते. त्याची परिपूर्ण तयारी या कारावासकालातच त्यांनी करून ठेवली. हा कारावास म्हणजे एक तपच ठरले. मोहजालांना वळसे घालीत परब्रह्माची उपासना करणाऱ्या विरागी साधकाप्रमाणे शास्त्रीजींनी कारावासाची नऊ वर्षे व्यतीत केली.

■■■

# ७ : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर

१९३० पासूनच लालबहादुर शास्त्री आणि भारताचे लोकप्रिय नेते पं.नेहरू यांचा सतत संबंध येत राहिला. पंडितजी उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाल्याबरोबर त्यांनी लालबहादुर यांना सरचिटणीसाच्या जागेवर नेमून टाकले. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या आंदोलन युगात प्रत्येक ठिकाणी लालबहादुर आघाडीवर होते. उत्तर प्रदेशात त्यांची लोकप्रियता शुक्ल पक्षातील चंद्राप्रमाणे वाढत होती. तुरुंगयात्रा हे तर त्यांचे व्रत होऊन बसले होते. कितीतरी वेळा पोलिसांच्या लाठीचा प्रसाद त्यांना मिळाला होता. त्याग आणि कष्ट यांना साथीला घेऊन अस्थिर जीवनाच्या मार्गावर त्यांनी कितीतरी दिवस वाटचाल केली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशाने आणि देशाच्या ज्येष्ठ नेत्यांनी लालबहादुरांच्या या असिधाराव्रताची कदर केली पण कदर होण्यापूर्वीच त्यांनी केलेल्या काही ठळक कामगिऱ्यांचा आढावा घेऊ या.

अलाहाबाद नगरपालिकेत लालबहादुर सतत सात वर्षे निवडून आले. नगरसुधार समितीचे ते चार वर्षे सभासद होते. या ठिकाणीच नेहरू कुटुंबाशी शास्त्रीजींचा अगदी जवळचा संबंध आला. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित याचे पती कै. रणजित पंडित हे लालबहादुरांचे नगरपालिकेत सहकारी होते. पंडितजींचे वडील मोतीलाल नेहरू हे शास्त्रीजींवर पितृवत प्रेम करीत. १९३३ मध्ये संयुक्त प्रांतातील शेत जमिनीची पाहणी करण्यासाठी तेथील काँग्रेसने एक समिती नेमली. या समितीचे सूत्र लालबहादुरांच्या हाती देण्यात आले. अहोरात्र परिश्रम करून लालबहादुरांनी या प्रश्नासंबंधीचे सर्व साहित्य वाचले, कागदपत्रे तपासली आणि अत्यंत जागरूकपणे आपला अहवाल तयार केला. हा अहवाल इतका अभ्यासपूर्ण झाला होती की अधिकाऱ्यांनी आणि तज्ज्ञांनी सुद्धा लालबहादुरांच्या अभ्यासूवृत्तीचे कौतुक केले. हा अहवाल म्हणजे जमीन प्रश्नांवरील एक ग्रंथच ठरला. १९३७ मध्ये संयुक्त प्रांतात काँग्रेसने अधिकारग्रहण केल्यावर याच अहवालाच्या आधारे जमिनीसंबंधीचा कायदा

करण्यात आला.

१९३६ मध्ये लालबहादुरांनी अलाहबादेतील आपला निवास हलवून ते लखनौला गेले. त्यांच्या कार्यासाठी त्यांना लखनौचा आदेश मिळाला होता. याच वेळी प्रांतीय कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या आणि लालबहादुर अलाहाबाद मतदारसंघातून निवडून आले. या निवडणुकांच्या पूर्वी काँग्रेसचा प्रचार, निवडणूक यंत्रणा, संघटन या सर्व गोष्टींमध्ये लालबहादुरांच्या जागरूक सूत्रसंचलनाचा वाटा फार मोठा होता. १९४६ साल उजाडले. दुसरे महायुद्ध संपून पुन्हा निवडणुकांची वेळ आली. काँग्रेसने निवडणुकांसाठी पुन: कंबर कसली. संयुक्त प्रांतातील काँग्रेस उमेदवार निवडण्यासाठी नेमलेल्या समितीचे चिटणीसपद लालबहादुरांना देण्यात आले. या वेळीही शास्त्रीजींनी आपल्या निवडणूक तंत्राचे कौशल्य दाखवून दिले. काँग्रेसला निर्विवाद व भरघोस विजय मिळाला. पण या विजयसोपानाची बैठक लालबहादुरांच्या अविश्रांत परिश्रमाने तयार झालेली होती.

स्वातंत्र्य मिळाले. पारतंत्र्याचे कृष्ण युग संपले आणि स्वातंत्र्याने अवतार घेतला. अवघा देश आनंदोत्सवात उजळून निघाला. पं. गोविंद वल्लभपंत हे उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री झाले. पं.पंत हे माणसाची पारख करून निवड करण्यात अतिशय कुशल होते.

लालबहादुरांचा निष्ठावंत कष्टाळू स्वभाव त्यांनी ओळखला होता. त्यांनी लालबहादुरांना मुद्दाम बोलावून घेतले आणि आपले पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून त्यांची नेमणूक करून टाकली. याच वर्षी काही दिवसांत संयुक्त प्रांताचे मंत्री रफी अहमद किडवाई हे केंद्र सरकारात गेले. त्यांच्या जागी लालबहादुर शास्त्री यांची नेमणूक करण्यात आली. त्यांच्याकडे पोलिस व दळणवळण खाते देण्यात आले.

या खात्याची सूत्रे हाती येताच आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे लालबहादुर शास्त्री यांनी अभ्यासपूर्व परिश्रम केले आणि दोन्ही खात्यांचा कारभार त्यांनी कमालीचा सुधारला. तो काळ जातीय दंग्याचा. संयुक्त

प्रांतात तर मोठ्या प्रमाणावर जातीय दंगे होत असत. यासाठी लालबहादुरांनी तेथे विविध योजना सुरू केल्या. स्वत:चे वर्तन व निर्णय अगदी नि:पक्षपाती आहेत याची ते स्वत: काळजी घेऊ लागले. प्रांतीय रक्षा दलाची त्यांनी स्थापना केली, आणि प्रांतातील तरुणांना या संघटनेत सामील होण्याचे कळकळीचे आवाहन केले. त्या योजनेला प्रतिसादही चांगला मिळाला. अत्यंत कुशलतेने, चतुराईने पण दृढपणे निर्णय घेऊन संयुक्त प्रांतात त्यांनी शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. पण याच वेळी पोलिस खात्याची कार्यक्षमता वाढविणे आणि जनता व पोलिस यांचे संबंध ठेवणे अशी दुहेरी कामगिरी त्यांनी यशस्वी करून दाखविली.

१९४२ च्या आंदोलनात तुरुंगात गेलेल्या तरुणांना त्यांनी पोलिस खात्यात वाव दिला. पोलिसांच्या वर्तनाविषयी आणि कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी काही वेगळ्याच कल्पना अमलात आणल्या. दंगेखोर जमावाला हटविण्यासाठी लाठीमार करण्याऐवजी पाण्याचा मारा करून त्रस्त करणे ही त्यांची अभिनव कल्पना चांगलीच यशस्वी ठरली. १९४९ साली विद्यार्थ्यांनी लखनौ येथे संप केला, पोलिसांजवळ लाठ्या होत्या पण त्यांचा उपयोग केला गेला नाही. अचानक, जमावावर जलधारा कोसळू लागल्या. पाऊस नसताना पाऊस, आणि समुद्र नसताना लाटा आदळू लागल्या. या जलधारा टोचणाऱ्या होत्या, सुखद नव्हत्या. रक्ताचा थेंबही न सांडता जमावाला हटविण्याचे कार्य तडीस गेले. एका ठिकाणी असाच बाका प्रसंग उद्भवला. पण शास्त्रीजींनी पोलिसांना लाठीहल्ला करू दिला नाही. जमावाने केलेल्या दगडविटांच्या माऱ्याने पोलिस जखमी झाले. नंतर लालबहादुर स्वत: इस्पितळात गेले आणि जखमी पोलिसांची अत्यंत आस्थेवाईकपणे त्यांनी चौकशी केली. एके ठिकाणी पोलिसांचा 'लाल पगडीवाले' असा क्रोधाने उल्लेख होताच लालबहादुरांनी दुसरे दिवशी पोलिसांना खाकी पगड्या घालून बंदोबस्तासाठी जाण्यास सांगितले आणि अशा तऱ्हेने अत्यंत चतुराईने प्राप्त परिस्थितीवर मात केली. असे अनेक

प्रसंग लालबहादुरांच्या पोलिसी कारवाईचे आहेत.

१९५० मध्ये पुरुषोत्तमदास टंडन यांच्या राजीनाम्यानंतर प. नेहरू काँग्रेसचे अध्यक्ष झाले. पंडितजींनी ताबडतोब लालबहादुर यांनाच दिल्लीला बोलावले आणि त्यांना अ.भा. काँग्रेसचे सरचिटणीस करून टाकले. अर्थातच लालबहादुरांनी आपल्या मंत्रिपदाचा राजिनामा दिला, आणि आपल्या नव्या खुर्चीवर नव्या कार्यासाठी ते विराजमान झाले. हे पद तर फारच महत्त्वाचे होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसवर फार मोठी जबाबदारी आलेली होती. ती पेलण्यासाठी अत्यंत बळकट आणि सूत्रबद्ध संघटनेची आवश्यकता होती. आपल्या संघटनेला अधिक बळकटी आणण्यासाठी शास्त्रीजींनी देशभर जणू यात्रा केली. सर्वत्र विविध परिस्थितींचे निरीक्षण केले. कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या. स्वातंत्र्यानंतरच्या काँग्रेसमधील बदलांचा आढावा घेतला. या वेळीही प्रचंड परिश्रम पणाला लावून शास्त्रीजींनी आपली कार्यक्षमता सिद्ध केली. पंडितजींच्या निवासस्थानीच दिल्लीला 'तीन मूर्ती' येथे त्यांचा निवास असे. ते इतके कामात गढलेले असत की जेवणाचे ताट नोकराने आणून ठेवले तरी त्याचा त्यांना पत्ता नसे. कधी कधी तर भोजनाचेही त्यांना भान नसे.

१९५२ साली लालबहादुर राज्यसभेचे सदस्य झाले. आणि त्याच वर्षी मे महिन्यात त्यांना मंत्रिमंडळात समाविष्ट करून घेण्यात आले. केंद्रीय मंत्रिमंडळात वाहतूक व रेल्वे खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे देण्यात आले. आपल्या स्वभावाप्रमाणे या खात्याचे काम करतानाही काटेकोरपणे व अत्यंत जागरूकपणे त्यांनी कारभाराला सुरुवात केली. पण या कामाचा पसारा एवढा अवाढव्य होता. त्यातील विस्कटलेली घडी थोडक्या अवधित सूत्रबद्ध करणे हा केवळ चमत्कारच होऊ शकला असता. रेल्वेचे वारंवार होणारे अपघात ही एक त्यांना कायमच त्रस्त करणारी घटना होती. हे अपघात थांबविण्यासाठी अत्यंत काळजीपूर्वक प्रयत्न करूनही अपघातांची संख्या व त्यातील हानी कमी होण्याचे लक्षण नव्हते. १९५६ च्या नोव्हेंबर महिन्यात अरियालूर येथे दक्षिणेत रेल्वेचा अपघात घडला. 'एक भयंकर अपघात' एवढेच याचे वर्णन पुरे होईल. १४४

प्रवासी ठार झाले. कित्येक जखमी झाले. रेल्वेची नासधूस फार झाली. शास्त्रीजींना या घटनेने जबर धक्का बसला. कारण रेल्वेमंत्री या नात्याने या भयंकर घटनेची जबाबदारी त्यांच्यावर होती. वास्तविक याबाबत शास्त्रींना कोणीही छेडले नव्हते; छेडले नसते पण त्यांची मुळातील सत्त्वशील असलेली विवेकबुद्धी त्यांना अत्यंत अस्वस्थ करू लागली आणि अखेर या अपघाताची घटनात्मक जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन शास्त्रीजींनी आपल्या मंत्रिपदाचा तत्काळ राजीनामा दिला. या घटनेने तर अनेकांना धक्का बसला. पण त्याचबरोबर लालबहादुरांच्या नैतिक श्रेष्ठतबद्दल आदरही दुणावला.

लालबहादुरांचा राजीनामा स्वीकारताना पं. नेहरू यांना अतिशय दुःख झाले. ते म्हणाले, अत्यंत प्रामाणिक व उच्च ध्येयनिष्ठ असलेल्या माझ्या या मित्राचा राजीनामा स्वीकारताना मला वाईट वाटते. या अपघातास वैयक्तिकरीत्या ते मुळीच जबाबदार नाहीत. पण घटनेची थोरवी राखण्याचा आर्दश ते घालून देत आहेत. म्हणून त्यांचा राजीनामा मला स्वीकारावा लागत आहे.'' लालबहादुर यांच्याविषयी पंडितजींनी काढलेले हे गौरवोद्गार खरे नव्हते असे कोण म्हणेल? शारीरिक सौम्यपणामागे आंतरिक प्रखर कार्यशक्ती आणि कडवा ध्येयवाद लालबहादुरांच्या ठायी आहे याचेच हे प्रत्यंतर होय. लालबहादुरांच्या राजीनाम्याचा बोलबाला सर्वत्र झाला. परकीय वृत्तपत्रांतूनही त्यांच्यावर भाष्य झाले. आपल्या सत्तात्यागाने लालबहादुरांनी काँग्रेस संघटनेतील इतर सत्तालोलुपांवर एक घवघवीत प्रहारच केला आणि नवशिक्यांना आणि उमेदवारी करणाऱ्यांना एक उजळ आदर्श घालून दिला. सत्तात्याग केल्यामुळे लालबहादुरांना खुर्ची सोडावी लागली. मंत्रिपद गमवावे लागले तरीपण राजकीय वर्तुळात त्यांचे स्थान अधिकच दृढ झाले. त्यांच्याविषयी कमालीचा आदर, दबदबा निर्माण झाला.

अर्थातच या त्यागवीराला फार काळ सरकारबाहेर राहू देणे म्हणजे देशाचे नुकसानच होते. १९५७ च्या निवडणुकीत पश्चिम अलाहाबाद मतदारसंघातून लालबहादुर लोकसभेवर निवडून आले. वाहतूक व

दळणवळणमंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली. पण नियतीने त्यांची या स्थानासाठी योजनाच केलेली मसावी. एक वर्षाच्या आतच मंत्रिमंडळाची पुनर्रचना करण्यात आली आणि लालबहादुरांकडे 'व्यापार व उद्योग' हे खाते सोपविण्यात आले.

आपल्या छोट्याशा कारकीर्दीत ग्रामीण विभागातील बेकारीचा प्रश्न कमी करण्यासाठी लालबहादुरांनी नवीन योजना हाती घेतल्या. शेती व उद्योग यांच्या एकत्रीकरणाबाबत या योजना होत्या. त्या बऱ्याच यशस्वी झाल्या. याच वेळी त्यांच्यावर आणखी एक जबाबदारी आली. केरळ प्रांतांतील काँग्रेस पक्षात वादंग माजले, फूट पडली. साहजिकच शास्त्रीजींना या आघाडीवर जावे लागले. काँग्रेसमध्ये एकजूट घडवून आणणे हे एखादी मोहीम यशस्वी करून दाखविण्यापेक्षाही कठीण काम. पण तेही शास्त्रीजींनी केले. या कामाचा त्यांच्या प्रकृतीवर फारच ताण पडला. शास्त्रीजी केरळहून परत आले. पण त्याच वेळी अलाहाबादाचा दुष्काळ त्यांच्याकडे आशेने पाहत होता. शास्त्रीजी तिकडे धावले. दुष्काळग्रस्त विभागांत दौरा काढून त्यांनी पाहणी केली व नियंत्रणाची चक्रे जोरदार फिरू लागली. केरळी कटकटींचा मनावर आणि प्रकृतीवरही विलक्षण ताण पडलेला होता. मनाला विश्रांतीची गरज होती. पण कामाच्या प्रचंड व्यापामुळे ते शक्य नव्हते. शरीर कुरुकुरु लागले. अलाहाबादच्या दौऱ्याच्या वेळीच शास्त्रीजींना हृदयविकाराचा सौम्यसा झटका आला. मग मात्र त्यांनी आपला कार्यशकट थांबविला आणि डॉक्टरांच्या कडक आदेशानुसार काही काळ पूर्णपणे विश्रांती घेतली. मात्र या विश्रांतीकालाचा वचपा पुढे भरून निघणार होताच. आणि शास्त्रीजीही त्यासाठी आतुर होते.

■ ■ ■

# ८ : गृहमंत्रिपदावरून

१९६०-६१ च्या सुमारास गृहमंत्री पं.पंत आजारी पडले. भारतासाख्या अवाढव्य आणि लोकशाही देशाचे गृहमंत्रिपद ही फारच जबाबदारीची जागा होती. पंतांच्या आसनावर लालबहादुरांची योजना झाली. उद्योगमंत्री व गृहमंत्री या दुहेरी जबाबदाऱ्या त्यांनी काही काळ सांभाळल्या. कामाचा हा अवाढव्य पसारा त्यांनी कसा सांभाळला असेल याची केवळ कल्पनाच केलेली बरी. एप्रिल १९६१ मध्ये पं. पंत स्वर्गवासी झाले. आणि गृहखात्याचे काम लालबहादुरांकडे सोपविण्यात आले. या पदावर लालबहादुरांच्या कार्यकौशल्याची खरी कसोटी होती. गृहखाते म्हणजे कटकटी, गृहखाते म्हणजे डोकेदुखी, असा सर्वांचा अनुभवसिद्ध समज आहे. ती सुळावरची पोळी असते. अनेक वेळा जनतेचे शिव्याशाप पदरी येतात. पक्षाची धोरणं सांभाळावी लागतात. कटू निर्णय घ्यावे लागतात, पण ही सुळावरची पोळी शास्त्रीजींनी खंबीरपणे स्वीकारली. देशात कायदा आणि सुव्यवस्था राखणे, राज्यकारभाराची यंत्रणा सांभाळणे ही कामे गृह खात्याकडे असतात.

लालबहादुरांच्या दैवरेषाच अशा विचित्र की, ते कोणत्या पदावर आले रे आले की त्या खात्याला संबंधित अशा बाबतीत काही भयंकर समस्या निर्माण होत आणि शास्त्रीजींना ते आव्हान स्वीकारावे लागे. एप्रिलच्या सुमारास त्यांनी गृहमंत्रिपदाची वस्त्रे घेतली आणि मे महिन्यातच आसाम प्रांतात भाषेच्या प्रश्नावर दंगली सुरू झाल्या. वास्तविक या दंगलींनी आधीच पेट घेतलेला होता पण १९६१ मध्ये त्यांनी अतिशय उग्र स्वरूप धारण केले. भाषिक प्रश्नावरील या चळवळीत पूर्वी विद्यार्थी सर्व राजकीय पक्ष आणि काही काँग्रेस पक्षीयांनीही भाग घेतला होता. बंगाली ही आसामची आणखी एक भाषा व्हावी हा या चळवळीतील प्रमुख मुद्दा होता. काचार जिल्ह्यात दंगलींनी अत्युच्च स्वरूप धारण केले. गौहत्तीला पोलिसांना जमावावर गोळीबार करावा लागला. अखेर तर लष्कराचीही मदत घ्यावी लागली.

लालबहादुरांनी गृहखात्याची सूत्रे हाती घेतली त्याला महिनाही लोटला नव्हता तोच हा वडवानल पेटला.

आपले सर्वस्व पणाला लावून शास्त्रीजी तातडीने आसामला गेले. तेथील दोन्ही पक्षांच्या प्रमुखांसमवेत त्यांनी चर्चा केली. विचार केला. आणि अशा काही खुबीने तडजोड केली की आसामचे स्वरूप पार बदलून गेले. आसामचे अग्निकुंड विझले तोच मास्टर तारासिंगची अकाली चळवळ सुरू झाली. त्यांना 'स्वतंत्र पंजाबी सुभा' हवा होता. तारासिंग ही शिखांमधील वजनदार असामी. त्यांनी उपोषणाचा धाक घालून त्याला सुरुवातही केली. एवढेच नव्हे तर पंजाबी सुभा न मिळाल्यास यमुना नदीला आग लावण्यात येईल अशी दरडावणी दिली. या धमकीचेही लालबहादुरांनी शांतपणे स्वागत केले. पण तिला भीक घातली नाही. पंजाबचे मुख्यमंत्री प्रतापसिंग कैरा यांच्या कणखरपणामुळे आणि लालबहादुर यांच्या शांत दृढ निश्चयामुळे पंजाबातील तारासिंग उपोषणाचा फुगा फुटला.

अशाच प्रकारची एक वेळ दक्षिणेत आली. हिन्दी-इंग्रजी वादाचा आधार घेउन द्रविड-मुन्नेत्र-कळघम ही चळवळ सुरू झाली. तिचे अनुयायी कडवे आणि एकतर्फी विचार करणारे होते. या चळवळीच्या हस्तकांना लालबहादुरांनी स्पष्टपणे बजावले की राष्ट्रविरोधी कारवाईची कोणत्याही तऱ्हेने गय केली जाणार नाही.

१९६२ च्या ऑक्टोबर मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. अस्मितेला एक जळजळीत आव्हानच मिळाले. देश खळबळून उठला. आतापर्यंतची राष्ट्राची नीज संपली. जागृति, जागृती आणि जागृती! क्रूर पिवळ्या सत्ताशाहीला टक्कर देण्यासाठी भारताची लोकशाही सामर्थ्य पणाला लावून सिद्ध झाली. राष्ट्राध्यक्षांनी आणीबाणीची परिस्थिती जाहीर केली. आजकालचे युद्ध हे आघाडीवर लढले गेले तरी त्याचा जाचक परिणाम पिछाडीला सोसावे लागतात. आणीबाणीच्या काळात राष्ट्रातील अंतर्गत कारभारात व नियंत्रणात सुव्यवस्था राखण्याचे काम गृहमंत्री या नात्याने

लालबहादुर यांच्याकडे आले. भारत संरक्षण कायद्याचा अंमल जारी करण्याची पाळी आली. या वेळी शास्त्रीजींनी आपले धोरण 'आवश्यक तेथे खंबीर व योग्य तेथे लवचिक' असे ठेवले होते. भारत संरक्षण कायद्याचा वापर अत्यंत संयमाने व उदार वृत्तीने करून कायदा जारी कसा करावा याचे आदर्श उदाहरणच त्यांनी घालून दिले. डिसेंबरात चीनने युद्ध थांबविले आणि तात्पुरता तरी धोका टळल्यासारखे वाटले.

लालबहादुरांनी दिलेली नेपाळभेट हा त्यांचा विलक्षण राजकारणपटुतेचा मासला सर्वश्रुत आहे. नेपाळ आणि भारत यांचे संबंध तत्पूर्वीच्या काळात दुरावल्यासारखे झाले होते. नेपाळची गैरमर्जी नेपाळी वृत्तपत्रांतून स्पष्टपणे दिसून येत होती. मार्च १९६३ मध्ये शास्त्रीजी नेपाळ गेले. प्रथम त्यांचे थंड स्वागत झाले. पण आपल्या मृदु व्यक्तिमत्त्वाने लालबहादुरांनी नेपाळमधील वातावरणच बदलून टाकले. नेपाळ–भारताच्या मित्रसंबंधावर असलेली गैरसमजांची कृष्णछाया त्यांनी अजिबात पुसून टाकली. शंकाकुशंकांचे ढग वितळले. आणि वातावरण इतके स्वच्छ झाले की दोन्ही राष्ट्रांतर्फे संयुक्त पत्रक काढले जाऊन नेपाळ–भारत यांच्या सलोख्याची आणि मैत्रीची ग्वाही पुन्हा एकदा देण्यात आली.

एवढ्या वेळात काश्मीरमध्ये आणखी एक प्रकरण पेटले. या वेळीही लालबहादुर यांच्या मर्मग्राही नियंत्रणशक्तीचा प्रत्यय सर्वांना आला. हे प्रकरण म्हणजे 'हजरत बाल प्रकरण' वास्तविक या वेळी शास्त्रीजी गृहमंत्री नव्हते. कारण याआधीच त्यांनी आपले आसन रिकामे केले होते. ऑगस्ट १९६३ मध्ये काँग्रेसचे अध्यक्ष कामराज यांनी काँग्रेस संघटनेच्या शुद्धीसाठी एक नवीन योजना पुढे आणली. या योजनेनुसार काँग्रेसमधील निरनिराळ्या 'खुर्चीवर' असलेल्या लोकांनी आपले राजीनामे द्यावेत व त्यांनी संघटनेच्या कामाला वाहून घ्यावे. या योजनेनुसार शास्त्रींजींनी आपला राजीनामा त्वरित दिला. वास्तविक या योजनेचा 'रोख' शास्त्रीजींच्या बाजूकडे नव्हताच पण पक्षशिस्त आणि आदर्श म्हणून त्यांनी राजीनामा दिला. एवढेच नव्हे तर तो

मंजूरही करावयास लावला. वास्तविक या पूर्वीच्याच काही दिवसांत शास्त्रीजींची कार्यतत्परता अगदी पणालाच लागली होती. पं. नेहरू परदेशाच्या दौऱ्यावर गेले असताना देशांतर्गत कारभाराची आणि समस्यांची सर्व जबाबदारी लालबहादुरांवरच सोपविली होती. अनेक अडचणींना तोंड देत देत, शिताफीने संकटांना टाळीत लालबहादुरांनी आपली जबाबदारी पार पाडली होती. लालबहादुरांचा राजीनामा कोणीच मंजूर केला नसता. पण 'आदर्श' घालून देण्यासाठी त्यांनीच त्यासाठी हट्ट धरला. आणि अखेर पुन्हा एका एकोणीसशे छप्पन्ननंतर लालबहादुर सत्तेच्या सिंहासनावरून स्वखुशीने खाली आले. यात त्यांच्या नि:स्वार्थ मनाची नि:संकोच साक्ष पटते.

पण देशाला हा सारथी हवा होता. त्याच्या हाती सुकाणू असल्याने देशाची नौका सुरक्षित होती हे सर्वांनाच समजून चुकले होते. याच सुमारास एक भयसूचक घटना घडली.

भुवनेश्वर येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात पं. नेहरू एकाएकी आजारी पडले. पंडितजींना अवाढव्य कार्याचा व्याप सांभाळण्यासाठी कोणीतरी विश्वासू कार्यनिष्ठ सहकारी हवा होता. अर्थातच लालबहादुरांचे नाव पुढे आले. आणि पुनश्च लालबहादुरांना मंत्रिमंडळात सन्मानपूर्वक बोलवण्यात आले. मात्र या वेळी त्यांच्याकडे कोणतेही खाते नव्हते. कदाचित त्यांची चतुरस्र कार्यशक्ती एकाच प्रकारच्या कामी न लावता सर्वत्र तिचा उपयोग करता यावा म्हणूनच ही योजना असावी. आता लालबहादुर बिनखात्याचे मंत्री झाले. लालबहादुरांना मात्र आपल्या कार्याविषयी निश्चिती हवी होती म्हणून पंडितजींना त्यांनी विचारले, 'मी कोणते काम करू ?' तेव्हा पंडितजींनीं सांगितले, 'माझेच काम करा.'

याच सुमारास हे 'हजरत–बाल' प्रकरण पेटले होते. महंमद पैगंबराचा एक 'पवित्र केस' चोरीला गेला होता. त्यावरून रान पेटले. आणि या घटनेचा धार्मिक भावनेशी संबंध असल्यामुळे हे प्रकरण कोणत्या थराला जाईल याची काळजी वाटत होती. पाकिस्तान या आपल्यातूनच फुटून

निघालेल्या राष्ट्राने आपल्या घरात असंतोष माजविण्याची संधी कधीच सोडली नाही. ही तर धर्माधिष्ठित पाकिस्तानला नामी संधी होती. नव्हे पर्वणी होती. या पर्वणीवरच पाकिस्तानच्या चिथावणीने काश्मिरात पाकिस्तानवादी लोकांनी असंतोष माजविला. राईचा पर्वत केला. ठिणगीचा वडवानल पेटू पाहत होते. पण एवढ्यात कार्यचतुर लालबहादुर धावून आले. शास्त्रीजी या वेळी काश्मीरच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांनी तातडीने या प्रकरणी लक्ष घातले, कसून शोध आणि कसून चौकशी सुरू झाली. 'हजरत-बाल' सापडला. काश्मिरात सर्वत्र आनंदीआनंद झाला.

सामान्य माणसाला आनंद होईल, पण माथेफिरू आणि विघ्नसंतोषी लोकांना दु:ख होईल अशीच ही घटना होती. कारण 'हजरत-बाल' सापडला म्हणजे त्यांच्या असंतोषाचे मूळ भांडवलच गेले. अर्थातच या समाजघातकी लोकांनी आणखी एकदा आग ओकून भडका केला की 'सापडलेला हजरत-बाल बनावट आहे' अर्थात विझलेला फुफाटा पुन्हा एकदा आग होऊ लागला. पण शास्त्रीजींनी आपले सर्व कौशल्य पणाला लावले. काश्मीर मधील प्रमुख मुल्ला मौलवींना 'हजरत-बाल' दाखवून त्यांच्याकडून त्याच्या सत्यतेविषयी प्रतिज्ञापत्रं लिहून घेण्यात आली. सहा फेब्रुवारी रोजी 'दीदार' करून सर्व जनतेला हजरत-बालचे दर्शन घेण्याची मुभा देण्यात आली. या गोष्टीमुळे जनतेचा विश्वास बसला. या गंभीर प्रकरणी शास्त्रीजींनी लक्ष घातले आणि ही समस्या सोडविली. म्हणून काश्मिरी जनतेने लालबहादुर यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली. शास्त्रीजी नुसती समस्या सोडवून थांबले नाहीत तर त्यांनी हजरत बालला १०१ रुपयांची देणगी दिली. त्यांच्या या देणगीचा तर वातावरण निवळण्यास फारच उपयोग झाला. एवढेच नव्हे तर हिंदू-मुस्लिमांच्या भावनिक ऐक्यासाठी शास्त्रीजींची देणगी हे एक प्रभावी अस्त्र ठरले. मुसलमानांच्या धार्मिक भावनांना भारत सरकार किती जपते, त्यांना किती मान देते हीच गोष्ट यावरून सिद्ध झाली. असंतोषाचे धनी गप्पगार झाले. समाजविघातक कृत्ये करणाऱ्या धर्मवेड्या माथेफिरूंच्या तोंडाला

कायमचे पलिस्तर बसले. लालबहादुरांची मुत्सद्देगिरीच या सर्व प्रकरणात कामास आली. हजरत बाल प्रकरणाचा अकारण वाढविलेला फुगा शास्त्रीजींनी अशा कौशल्याने फोडला की कोणी दुखावले तर नाहीच पण फुगाही फुटला आणि समस्याही सुटली. समाजद्रोही पाकिस्तानधार्जिण्या लोकांच्या काळ्या कारवाया भुईसपाट झाल्या.

याचवेळी काश्मीरच्या राजकीय वर्तुळात फार मोठ्या घडामोडी होऊ लागल्या. काश्मीरच्या सत्तेत खांदेपालट झाला. आणि नवे सादीक सरकार अधिकारावर आले. हा सत्ताबदल घडविण्यात शास्त्रीजींचा पुढाकार होता. त्याचप्रमाणे शास्त्रीजींनी आपल्या मुत्सद्देगिरीतून आणखी एक निर्णय घेतला तो म्हणजे शेख अब्दुला यांची मुक्तता. या निर्णयाला देशांतील अनेकांचा विरोध होता. पण देशाच्या अंतिम हिताकडे नजर ठेवून शास्त्रीजींनी आपल्या सदसद्‌विवेक बुद्धीला आवाहन केले आणि ठामपणे तो निर्णय अमलात आणला.

अशा तऱ्हेने गृहमंत्रिपदावरुन शास्त्रीजींनी आपले 'गृह' उत्तम सांभाळले असेच आपणाला दिसून येईल. बिनखात्याचे मंत्री म्हणून का होईना पण पं. नेहरूंनी लालबहादुरांना मंत्रिमंडळात आवर्जून घेतले आणि जवळजवळ देशाची सर्व जबाबदारी त्यांच्यावरच सोपविली. देशाच्या विविध कार्यक्षेत्रांमध्ये बोकाळलेली लाच-लुचपत कशी कमी करता येईल यावर शास्त्रीजींनी विचार करून उपाययोजनेसाठी एक समिती नेमली. गुन्हेगारी हुडकून काढण्यासाठी त्यांच्याच काळात 'सेंट्रल ब्यूरो ऑफ इनव्हेस्टिगेशन' स्थापन झाला. कोणत्याहि प्रश्नाचा मूलगामी विचार करणे, तातडीने अंमलबजावणी करणे, कोणताही एक पक्ष न घेता तर्कशुद्ध विचार करून सदसद्‌विवेक बुद्धीला पटेल अशाच सत्पक्षाची बाजू घेणे, घेतलेल्या निर्णयाला ठामपणे चिकटून राहणे आणि सामोपचाराने चर्चा करून प्रश्न न सुटल्यास दंडयोजना करणे ही शास्त्रीजींची कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये आहेत. या त्यांच्या कार्यपद्धतीला 'शास्त्रीजी तंत्र' असे नावच काँग्रेसच्या वर्तुळात रूढ झालेले आहे.

■ ■ ■

# १ : काटेरी मुकुट

भुवनेश्वरच्या काँग्रेसच्या अधिवेशनात 'भारत भाग्यविधाता' पं. नेहरू आजारी पडले. कृतांतकटकामलध्वजजरा दिसू लागली होती. काळाच्या सांगाव्याची ही पहिली पावलेच नव्हती का? सारा देश अस्वस्थ झाला. नेहरूंनंतर कोण? असा प्रश्न अनेक वर्ष भारताला भेडसावत होता. संधिसाधू परकीयांनी तर भविष्यच केले होते की, पं. नेहरू यांच्यानंतर भारतात जोराची सत्तास्पर्धा होईल. भारताचे भांडे फुटेल. पं. नेहरूंनाही अनेक वेळा हा प्रश्न विचारण्यात येई. 'तुमच्यानंतर कोण?' ते म्हणत, 'हा लोकशाही देश. आपला नेता तेथील जनताच निवडील.' पं. नेहरूंच्या अचानक आजारामुळे सगळा देश चिंतेने ग्रासून गेला. पं. नेहरूंनी आपल्या सच्च्या मित्राला बोलावून घेतले आणि त्याच्या खांद्यावर जोखड ठेवले. हा मित्र कोण? अर्थातच लालबहादुर. दोन वेळा स्वखुशीने सत्तात्याग करणारा. विश्वासू सहकारी, कष्टाळू आणि खंबीर मनाचा हा मित्र पंडितजींनी आपल्याजवळ ठेवून घेतला यात नवल ते कसले!

लालबहादुरांना पंडितजींनी जेव्हा सांगितले की, 'तुम्ही माझेच काम करा', तेव्हाच खरे म्हणजे नेहरूंनंतर कोण? हा प्रश्न सुटला होता. पंडितजींचे हे उद्‌गार सूचक नव्हते असे कोण म्हणेल? कारण अवघ्या दोन महिन्यांनंतर त्यांचे उद्‌गार सत्यस्वरूप झाले. भुवनेश्वरच्या आजारानंतर पंडितजी डेहराडून येथे विश्रांतीसाठी गेले. आणि येताना नेहमीप्रमाणे ताजेतवाने होऊन आले. पण हा ताजेपणा सुकण्यापूर्वीचा होता, हा सुगंध नष्ट होण्यापूर्वी दरवळलेला होता, ही ज्योत मालवण्यापूर्वी मोठी झालेली होती. आपल्या आंतरिक इच्छाशक्तीमुळे आणि प्रखर जीवनोत्साहामुळे पंडितजी ताजेतवाने दिसले तरी, 'चित्रगुप्ताच्या वहीतील त्यांचे पान भरले असावे' आणि म्हणूनच काळाने काहीही कल्पना न देता भारतावर स्वारी केली. ऐन दुपारी! भर उन्हात! १९६४ सालचा मे महिना. तारीख सत्तावीस.

वेळ दुपारची. काळाने घाला घातला. सर्वांचा लाडका नेता काळालाही जणू लाडका वाटला. सारा देश दुःखसागरात बुडाला. लोकसभेत मंत्री सुब्रह्मण्यम यांनी एवढेच सांगितले 'दिवा विझला' आणि ही बातमी ऐकून प्रखर उन्हातही देश अंधाराच्या खोल दरीत बुडून गेला.

तात्पुरती व्यवस्था म्हणून त्या वेळचे गृहमंत्री श्री. नंदा हे पंतप्रधान झाले आणि नंतर नव्या पंतप्रधानांच्या निवडीसाठी काँग्रेसच्या बैठकी झाल्या. पं. नेहरूंच्या गादीवर बसणारा नेता त्यांच्याच तालमीत तयार झालेला हवा होता. शिवाय पंडितजी नंतर त्या सिंहासनावर बसणे एक प्रकारे आव्हानच होते. जागतिक कीर्तीचे पं.नेहरू जेथे होते ती जागा भूषविणे अवघडच नव्हे का? नेहरू गेले. आधुनिक भारताच्या जीवनातले एक पर्व संपले. ही पोकळी भरून काढणारा तितक्याच प्रतिष्ठेचा, जिद्दीचा हवा होता. काँग्रेस अध्यक्ष कामराज यांनी अनेक मान्यवर पुढाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या. सर्वांनीच- काही अपवाद सोडून-एकाच नावाला एकमुखाने पाठिंबा दिला - 'लालबहादुर'

पं. नेहरूंच्या महाप्रयाणाला अजून आठवडा व्हावयचा होता. भारतीयांच्या गालावर ओघळलेले अश्रू अजून वाळले नव्हते. तरीही त्यात चलबिचल नव्हती. अवघा भारत स्थितप्रज्ञ गांभीर्यात बुडून गेला होता. सारे जग भारताकडे मिस्कीलपणे बघून मिशीत हसत होते. आता या लोकांचे काय होणार? पण भारतीयांनी त्यांना जबर टोला दिला. भारतीयांची लोकशाहीवरील निष्ठा आणि संघटनेवरची मजबुती पुन्हा एकदा चांगली सिद्ध झाली. २ जून ! मान्यवरांची सभा भरली. पंडितजीच्या दुःखद निधनाची छाया सभेवर होतीच. गंभीर आवाजात बोलणी झाली. विरोध नाही. वादंग नाही. एकमुखाने नाव सुचविण्यात आले 'भारताचे नवे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री'!

अवघ्या देशाने, आसेतुहिमाचल, लालबहादुरांचा मुक्तकंठे जयजयकार केला. देशोदेशीच्या महाभागांनी, वृत्तपत्रांनी त्याच्यावर अभिनंदनाचा

पाऊस पडला. ४७ कोटी जनसंख्या असलेल्या महाभारताची व रामायण-गीतेची महान परंपरा असलेल्या लोकशाहीप्रधान देशाचा पंतप्रधान होणे ही जगातही अत्यंत श्रेष्ठतेची घटना समजली जाते. लालबहादुरांच्या निवडीचे वृत्त त्यांच्या वृद्ध मातोश्रींना कळले. ऐंशी वर्षांच्या या वृद्ध मातोश्रींचे उद्‌गार "मैं लालबहादुरसे चाहती हूं के जान चले तो जाय मगर देश बना रहे।" देशनिष्ठेची अत्यंत कळकळ असलेल्या मातेचा सुपुत्र म्हणजे लालबहादुर. सत्तेच्या आणि वैभवाच्या अत्युच्च शिखरावर असतानाही लालबहादुरांच्या मातोश्रींनी त्यांना सूचक जाणीव दिली 'गरिबांना त्रास होईल, उपद्रव होईल असे काहीही करू नकोस.' लालबहादुरांनी आपल्या आईचा हा उपदेश तंतोतंत पाळलेला आहे. १९६४ च्या ऑगस्टमध्ये भारत सरकारच्या सचिवांच्या सभेत बोलताना लालबहादुर म्हणाले, "दारिद्र्याचे चटके कसे असतात हे मला माहीत आहे. दरमहा अडीच रुपयांवर माझ्याच कुटुंबाचा मला गुजारा करावा लागला आहे. म्हणूनच मी ज्या वेळी भारत सरकारचा मंत्री झालो, आलिशान बंगल्यात राहू लागलो, त्या वेळी अधिकाराच्या आणि वैभवाच्या मोहाला बळी न पडता माझे पूर्वीचेच साधे जीवन जगण्याचा मी निश्चय केला." या निश्चयाप्रमाणे लालबहादुर कटाक्षाने वागले. स्वत: वागले आणि या गरीब देशाच्या गरिबीची जाणीव ठेवून त्याला वैभवशाली बनविण्यासाठी अप्रतिहत प्रयत्न ते करीत राहिले.

११ जून १९६४ रोजी लालबहादुर 'पंतप्रधान' झाले. पहिल्याच दिवशी त्यांनी राष्ट्राला उद्देशून अत्यंत कळकळीचे विचारगर्भ भाषण केले. या भाषणांत त्यांची नम्रता, विचारदृढता, देशाविषयीची आत्यंतिक तळमळ यांचा शब्दाशब्दांतून प्रत्यय येत होता. या पदावर आपल्याला बसवून देशाने फार मोठी जबाबदारी टाकली आहे याची नम्र जाणीव शास्त्रीजींना होती.

लालबहादुरांचे कार्यालय अगदी साधे असे. स्वच्छता मात्र कमालीची

असे. खुर्चीत ताठ बसून मृदू आवाजात भेदक नजरेने आपल्या पाहुण्याला शास्त्रीजी प्रश्न विचारत. त्याच्याशी बातचीत करत. त्यांच्या वागणुकीतील साधेपणा आणि त्याचवेळी त्यांच्या शब्दातील धारदारपणा यामुळे त्यांच्याकडे येणारी व्यक्ती चकित होत. पंतप्रधान झाल्यापासून त्यांनी काही परदेशी दौरे काढले. कॉमनवेल्थ परिषदेला प्रथम आजारीपणामुळे त्यांना जाता आले नाही. पंतप्रधानाची वस्त्रे काही दिवस त्यांच्या शरीराने मान्य केली नाहीत. पहिल्या महिन्यांतच शास्त्रीजींची प्रकृती नादुरुस्त झाली. कारण या काळात ते अठरा-वीस तास काम करीत असत. भारताचे पंतप्रधान या नात्याने नवे मंत्रिमंडळ तयार करण्याची एक अतिशय अवघड, नाजूक कामगिरी त्यांना करावी लागली होती. मंत्रिमंडळाची निवड ही तारेवरची कसरत! अनेक लोक दुखावले जात. पण सर्वांचे सर्वप्रकारे समाधान करणेही शक्य नसते. पण शास्त्रीजींनी यातील सुवर्णमध्य गाठला. आपले नेहमीचे 'शास्त्रीजी तंत्र' वापरून कोणाचेही आक्षेप न घेता त्यांनी मंत्रिमंडळ बनविले.

राज्यकारभार 'शास्त्री तंत्राने' सुरू झाला. शास्त्रीजींनी अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेला उपस्थित राहण्याचे ठरविले. त्याप्रमाणे ते कैरोला गेले. त्यांच्या कैरो-भेटीने संयुक्त अरब प्रजासत्ताक व भारत यांचे संबंध अधिक जवळचे झाले. येताना लालबहादुर मुद्दाम कराचीला उतरले. आणि त्यांनी पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल आयूबखान यांची भेट घेतली. या भेटीलाही विशेष महत्त्व हे की याच सुमारास पाकिस्तानच्या कारवाया खूप वाढल्या होत्या. होता होईल तो सामोपचाराने समस्या सोडवाव्यात या मताचे शास्त्रीजी होते. यामुळेच त्यांनी आयूबची भेट घेतली. त्याच्यासमवेत अत्यंत साधे व शाकाहारी जेवण घेतले. अर्थातच आयूबखानसारख्या माणसावर अशा भेटीचा काहीच परिणाम होणार नसतो हे गृहीतच आहे.

यानंतर शास्त्रीजी ब्रिटनच्या दौऱ्यावर गेले. कॉमनवेल्थ परिषदेला त्यांना आजारामुळे जाता आले नव्हते. या दौऱ्याचा मुख्य उद्देश परराष्ट्रांतील

प्रतिष्ठितांचा परिचय करून घेणे आणि अधिक दृढ मैत्रीसाठी संपर्क साधणे हा होता. तो उद्देश तर सफल झालाच पण शास्त्रीजींच्या विषयी ब्रिटिश जनतेच्या ज्या कल्पना तयार झाल्या होत्या त्या पार बदलून गेल्या. ब्रिटनसारख्या अत्याधुनिक राष्ट्रांतही धोतरात असलेली बटुमूर्ती हा ब्रिटिश जनतेचा औत्सुक्याचा विषय होता. त्यांनी थंडीलाही दाद दिली नाही. आणि आपला वेश बदलला नाही. लंडनच्या नावाजलेल्या वर्तमानपत्रांनी शास्त्रीजींच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना लिहिले, " नव्या भारताचे शास्त्रीजीच खरेखुरे नैसर्गिक प्रतिनिधी आहेत" ब्रिटिश मंत्र्यांवरही शास्त्रीजींच्या सौम्य वर्तनाचा, साधेपणाचा फारच परिणाम झाला.

पं. नेहरूंच्या रिकाम्या आसनावर शास्त्रीजी आता अगदी चपखल बसले. त्यांचे देशावरच अलोट प्रेम! देशालाही या आपल्या नव्या नेत्याबद्दल विश्वास वाटू लागला. देशांतील गरीब जनतेला आधार वाटू लागला. त्यांचे नि:श्वास बोलू लागले :- 'यांच्या हातात आपला देश सुरक्षित राहील' आणि लवकरच या विश्वासाला एक प्रचंड आव्हान मिळाले. भारताचाच लालसी लचका तोडून निर्माण झालेले पाकिस्तान आपल्या या मोठ्या भावाचा भयंकर मत्सर सुरुवातीपासूनच करीत होते. येनकेन प्रकारेण भारताला त्रास देत राहणे हेच जणू पाकिस्तानचे ब्रीद. स्वातंत्र्यनिर्मितीपासूनच 'काश्मीर' प्रश्न भिजतघोंगड्यासारखा पडला होता. तेवढ्यात १९६२ साली चीननेही दावा साधलेला होता. आणि त्यानंतर पाकिस्तानने भारताच्या कच्छ सीमेवर उघडउघड आक्रमण केले. त्याआधी गेल्या अठरा वर्षांत हजारो वेळा शस्त्रधारी टोळीवाले पाठवून भारतीय मुलुखांत शिरून तिथे लूटमार करण्याचा पाकिस्तानने शिरस्ताच ठेवला होता. कच्छच्या आक्रमणाबाबत आपल्याही देशात रणे माजली. अखेर पाकिस्तानाशी शस्त्रसंधी करार झाला. कच्छ-करार देशातील लोकांना मानवला नाही. अनेकांनी नापसंती व्यक्त केली. पण शास्त्रीजींनी शांतपणे याही विरोधाला तोंड दिले. पण पाकिस्तानच्या मदांध पुढाऱ्यांनी

या शांततेचा जणू अंतच पाहण्याचे ठरविले. आणि कच्छ कराराची शाई अजून पुरती वाळली नाही तोच पाकिस्तानने आपल्या भेसूर मनोवृत्तीचे प्रदर्शन करून काश्मीर भागात हजारो शस्त्रधारी सैनिक घुसवून अतिक्रमण केले. आता मात्र भारतीय जनतेचा असंतोष शिगेला पोचला. शास्त्रीजीही एक भारतीयच ! जनतेच्या भावना त्यांनी समजून घेतल्या. मंत्रिमंडळाच्या बैठकी घेतल्या. सेनाप्रमुखांशी दीर्घ चर्चा केली. आणि अखेर अठरा वर्षे मुजोरपणे गुंडगिरी करणाऱ्या पाळेगारांना पाणी पाजण्यासाठी भारतीय सेना आगेकूच करू लागली.

पाकच्या नापाकांची कल्पना अशी होती की, पं. नेहरूसारख्या आंतरराष्ट्रीय व्यक्तिमत्त्वाच्या पंतप्रधानाला आपण दाद दिली नाही मग या साडेचार फूट उंचीच्या पंतप्रधानाला आपण सहज नमवू. पण छे! तो निव्वळ भ्रम ठरला. कारण ती त्यांची शारीरिक उंची होती. पण त्यांच्यापाठी पंचेचाळीस कोटी जनतेचा आवाज होता. त्यामुळे आमच्या या लहानशा पंतप्रधानांची उंची पंचेचाळीस फूट झालेली होती. अखेर आयूबखानासारख्या माजलेल्या मस्तवालाला या उंचीपुढे नमावे लागले. गेल्या अठरा वर्षांत जे घडलेच नाही ते घडले ! 'ये दाल चावल खानेवाले क्या करेंगे' अशी एक समजूत भारताविषयी होती. चिनी आक्रमणाच्या वेळी फारशी तयारी नसल्यामुळे या समजुतीला दृढता आली होती. पण वेळ आली तर शांतताप्रिय भारत अहिंसेची वल्कले सोडून देऊन पराक्रमाची व्याघ्रांबरे धारण करू शकतो हे भारतीय सेनेने, जनतेने आणि नेत्यांनी दाखवून दिले. अमेरिकन शस्त्रास्त्रांच्या समृद्ध पाठबळामुळे पाक मुजोर झाला. पण 'फुगला फुगला बेडूक जरी फुगला तरी पण बोला, बैलाएवढा कसा फुगणार'-- अशीच गत पाकची झाली. 'लढाई शस्त्र जिंकत नाही, शस्त्रधारी मने जिंकते' ही गोष्ट पाकच्या ध्यानीमनीही नव्हती. अमेरिकेच्या विश्वविजयी पॅटन रणगाड्यांची भारतीय जवानांनी मामुली कारवाई करून चटणी उडविली हे पाहून पाश्चात्त्य लष्करी तज्ज्ञही स्तंभित झाले. आणि

भारतीय सेनेच्या कर्तृत्वाचा ध्वज विश्वमंडपावर फडकला!

या अभूतपूर्व यशाचे अग्रदूत नि:संशयपणे पंतप्रधान लालबहादुर हेच आहेत. लालबहादुरांनी पाकची मुजोर कारवाई भुईसपाट करण्याचा जणू चंगच बांधला. सैन्य तर केव्हाचेच तयार होते. खिजवणाऱ्या जगाला सणसणीत चपराक देण्यासाठी जवानांचे हात शिवशिवत होते. फक्त आज्ञेचा अवकाश होता. आणि काय आश्चर्य! गेल्या अठरा वर्षांत मिळाली नव्हती ती आज्ञा मिळाली. पराक्रमाला महाद्वार मोकळे झाले. विजयश्रीला वाट मिळाली. चिनी आक्रमणाच्या वेळी भारतावर आलेला- भारतीय सेनेवर आलेला कलंक तर साफ धुवून निघालाच पण त्या जागी पुरुषार्थाचे तेजस्वी वलय निर्माण झाले.

भारतीय सेना हे धवल यश संपादन करीत असतानाच भारतीय जनतेने भक्कम एकजूट करून पंतप्रधानांना एकमुखी पाठिंबा दिला. सर्व प्रकारची आंदोलने मागे घेतली गेली. देशभर उत्साहाचे, धैर्याचे आणि तेजस्वितेचे वातावरण निर्माण झाले. भारतीयांची अस्मिता जागृत झाली. 'अवघा भारत एक आहे' हे देदीप्यमान चित्र जगाला दिसले. याचे श्रेय जनतेकडे आणि जनतेच्या विविध भागांतील नेत्यांकडे जातेच पण त्याचबरोबर जनतेचा एकमुखी पाठिंबा मिळविण्यासाठी लालबहादुरांनी केलेल्या असीम प्रयत्नांचा अभ्यासही करण्यासारखा आहे. प्रथम त्यांनी कोणती गोष्ट केली असेल तर ती ही की सर्व विरोधी पक्षीयांना विश्वासात घेतले. देशांतील विविध संघटनांचे नेते एकत्र बोलावून त्यांना सल्ला विचारला, आवाहन केले. ही बैठक स्वतंत्र भारताच्या इतिहासात एकमेवाद्वितीयच म्हटली पाहिजे. कारण या बैठकीचे वर्तमानपत्रात जे फोटो आले त्यात बॅ.नाथ पै, पंतप्रधान शास्त्री, रा स्व. संघाचे गोळवलकर गुरुजी, स.का.पाटील. मुस्लीम समजाचे ज्येष्ठ नेते असे कधीही एकत्र न येणारे लोक स्वदेशरक्षणाच्या निमित्ताने एकत्र आलेले दिसले. आणि त्यांनी हेच दाखवून दिले की एरवी आमच्यांत विचारभिन्नता असली तरी परचक्राला फोडून

काढण्यासाठी 'वयं पंचाधिकं शतम्' आहोत. ही किमया घडवून आणण्याचे सारे श्रेय लालबहादुर शास्त्री यांनाच आहे. पाकिस्तानी आक्रमणाविरुद्ध भारताने जी यशस्वी कारवाई केली त्यामुळे लालबहादुर शास्त्री यांचे एक वेगळे खंबीर व्यक्तिमत्त्व जगापुढे आले. खरोखरच लालबहादुर यांनी जगाला आश्चर्यात टाकले.

युद्धकाळात त्यांनी आकाशवाणीवर भाषणे केली. पत्रकारांना मुलाखती दिल्या. संसदेत निवेदने केली. या प्रत्येक वेळी, परिस्थिती गंभीर असूनही लालबहादुरांच्या स्वरात ठिसूळपणा नव्हता, उसना आवेशही नव्हता किंवा अनाठायी गर्वही नव्हता. होता तो प्रखर आत्मविश्वास आणि खंबीर कृतनिश्चय! लालबहादुर म्हणाले "पाकिस्तानी जनतेबरोबर आमचे युद्ध नाही. आमचा विरोध आहे तो आक्रमक वृत्तीला. म्हणूनच आमचे उद्दिष्टही मर्यादित आहे." आपले मर्यादित उद्दिष्ट साध्य झाल्यानंतरच सदिच्छा व्यक्त करणाऱ्या मध्यस्थांच्या म्हणण्याला मान देण्याचा मोठेपणाही लालबहादुर शास्त्री यांनी दाखविला, आणि युद्धबंदी मान्य केली. त्यांची आकाशवाणीवरील भाषणे ऐकण्यासाठी लोक समूहाने एकत्र जमून मोठ्या भक्तिभावाने श्रवण करतात असे लेखकाचे निरीक्षण आहे. त्यांची भाषणे मृदू असली तरी या मार्दवाला निश्चयाची धार आहे. लालबहादुर युद्धाबाबतची निवेदने संसदेत अशा काही स्वरात करीत असत की सदस्यांना टाळ्या वाजवून आपला प्रतिसाद व्यक्त केल्याशिवाय राहवत नसे. आकाशवाणीवर केलेल्या भाषणांत व संसदेतही धारातीर्थी पडलेल्या जवानांना आणि सैन्याधिकाऱ्यांना श्रद्धांजली वाहताना त्यांचा कंठ रुद्ध झाला होता. आपल्या ओल्याचिंब आवाजात शास्त्रीजी म्हणाले "त्यांनी आपला देश जगावा म्हणून बलिदान केले, मरण पत्करले, हा कृतज्ञ देश त्यांची सेवा कधीही विसरणार नाही." शास्त्रीजींचे हे भावपूर्ण शब्द ऐकून श्रोत्यांना उचंबळून न आले तरच नवल!

अशा तऱ्हेने शास्त्रीजी पंतप्रधान झाल्यापासून त्यांच्यामागे देशाच्या

संरक्षणाच्या, अंतर्गत व्यवस्थेच्या अनेक समस्या होत्या. पंतप्रधान ही मानाची जागा तर खरीच. पण तो मुकुट काटेरी आहे. ती गादी रेशमाची नाही अंकुशांची आहे. ती शाल नाही, ते चिलखत आहे. ते महावस्त्र नाही तर शरीराला बोचणारे, कर्तव्याची सतत जाणीव करून देणारे खडबडीत वल्कल आहे. पंतप्रधान शास्त्री यांनी ही वल्कले धारण केलेली आहेत. नव्हे त्यांनी ती आधीच धारण केलेली होती. हा काटेरी मुकुट त्यांच्या शिरोभागी आहे. पण त्याबद्दल त्यांची तक्रार नाही. कारण ही देशसेवा आहे. हे व्रत आहे. याची त्यांना सदैव जाणीव होती. भारत-पाक संघर्षाचा निकाल अजून लागायचा आहे. तो काय होणार तो होवो. पण या संघर्षाच्या दिव्यांतून भारत उजळेल-मुशीतून काढलेल्या सोन्याप्रमाणे त्याचा कस लागेल. आणि अशा दिव्यत्व पावलेल्या भारतभूमीचे नेतृत्व लालबहादुरच खंबीरपणे करतील, त्यासाठी ते कटिबद्ध आहेत. यांची मूर्ती लहान असली तरी कृती महान आहे हे आता सिद्ध झाले आहे.

■ ■ ■

# १० : तृणपाते

लालबहादुर शास्त्री यांना आतापर्यंत पंतप्रधानाच्या आसनावरून पाहिले. आता त्यांच्या माजघरातून त्यांना पाहू या. लालबहादुरांचे आयुष्य अनेक घटनांनी, समस्यांनी ओतप्रोत भरलेले आहे. पण त्यांची त्याबद्दल तक्रार कुठे ? त्यांच्या सारखीच त्यांच्या घरातील सर्व माणसे साधी, सदाचारसंपन्न आहेत. लालबहादुरांच्या पत्नी ललितादेवी या तर भक्तिमार्गाच्या उपासक आहेत. त्या कट्टर शिवभक्त असून पूजाअर्चा व जपजाप्य यांचे व्रत कठोरपणे त्या पाळतात. त्याचप्रमाणे एखाद्या सामान्य गृहिणीप्रमाणे त्याही संसारातच रमून गेलेल्या असतात. लालबहादुर पंतप्रधान झाल्यावर सौ. ललितादेवींना कोणीतरी महिला मंडळाच्या कार्यक्रमास बोलावले. पण त्यांनी साफ नकार दिला. 'संसार व शिवभक्ती' हेच माझे प्रमुख कार्य असे त्या म्हणतात.

लालबहादुरांच्या साधेपणाचा त्यांच्या सबंध शास्त्री-कुटुंबावरच विलक्षण परिणाम झाला आहे. लालबहादुरांजवळ अवाढव्य शरीरसंपदा नाही. पण केवळ शरीराने मोठा असणाराच कर्तबगार होतो असे नाही. हे त्यांनी परिश्रम आणि प्रयत्न यांच्या जोरावर सिद्ध केले. नेल्सन, नेपोलियन इत्यादी महाबलाढ्य सेनानीसुद्धा शरीराने बेताचेच होते. त्यांची उंची जरी बोटाएवढी होती, तरी त्यांचे मन हिमालयाएवढे उंच, अचल होते. लालबहादुरांच्या बाबतीत हेच म्हणता येणार नाही का ? लालबहादुर हे दिसायला आणि वागायला नेहमीच नम्र असत-तृणपात्यासारखे. लहानपणी गुरू नानक यांच्या काव्यातील एक श्लोक त्यांना फार आवडत असे. तोच ते सदैव जिभेवर घोळवीत. आणि त्या श्लोकांतील सुवचनाप्रमाणे ते आपले आचरण ठेवीत. तो श्लोक असा होता-

नानक तुम्ही सान रहा, जणू पाते गवताचे !
झाडेझुडपे झडून जातिल, उदंड राहिल तृण साचे !

नानकांचे हे वचन जे लालबहादुरांना फार आवडते. लालबहादुर शास्त्री यांच्या बाबतीत तंतोतंत खरे ठरले. त्यांच्या आयुष्यात अनेक वादळे झाली. घरात झाली, बाहेर झाली. पण लालबहादुर टिकून राहिले. राजकारणात तर सत्तेच्या उलथापालथीची वादळे नेहमीच होतात. देशभक्तीचं प्रदर्शन करणारे महापूर येतात, पण त्यात टिकतो कोण ? लालबहादुरांच्या बरोबरीचे लोक, जे त्यांच्या आधी भारतीय राजकारणावर उदयास आले होते, आता मागे पडले. पुरानं झोडपल्या जाणाऱ्या झाडाझुडपांप्रमाणे त्यांची अवस्था झाली. पण हे धारदार तृणपाते मात्र तग धरून राहिले. नव्हे त्याने आसपासच्या प्रदेशावर सत्ता मिळविली.

बालपणापासूनच हालअपेष्टा भोगत असलेले लालबहादुरांचे मन विलक्षण संस्कारक्षम बनले होते. लालबहादुर सहा वर्षांचे असताना एक चमत्कारिक गोष्ट घडली. त्यांना आणि त्यांच्या मित्रांना दांडगाई करण्याची इच्छा होऊन या सगळ्या माकड मंडळींची नजर वळली ती सार्वजनिक बागेकडे. बहुतेक सगळी मुले झाडावर सरसर चढली. पण लालबहादुर- नन्हे-खालीच उभा. फळांऐवजी त्याने एक फुल मात्र तोडले. एवढ्यात माळी आला. बाकीची मुले पळून गेली. माळ्याने नन्हेला पकडले, बेदम चोपले. नन्हे गयावया करीत म्हणाला, "मला मारू नका हो. मला वडील नाहीत. मी गरीब आहे." पण त्यावर माळी म्हणाला, " मग तर तुझ्यावर अधिक चांगले वागण्याची जबाबदारी आहे." या उद्‌गारांचा लालबहादुरांच्या मनावर फार परिणाम झाला आहे. आणि आजतागायत चांगले वागण्याची ही जबाबदारी त्यांनी कधीही झटकून टाकली नाही.

आणखी एक गंमत अगदी सुरुवातीची आहे. लालबहादुर अवघे चार महिन्यांचे होते. रामदुलारीदेवी छोट्या नन्हेला घेऊन नावेतून गंगापार जात होत्या. नावेत बेहाय गर्दी! कडेवरून मूल निसटले. नन्हे बेपत्ता झाला. आईचा शोक आवरेना. कोलाहल माजला. बरीच शोधाशोध झाली. पण मुलाचा शोध नाही लागला. पण नन्हेला असा बेपत्ता होऊ देणे परमेश्वराला

बरे वाटले नसावे. नन्हे जो घसरून पडला तो एका शेतकऱ्याच्या टोपलीत अलगद जाऊन पडला. शेतकऱ्याने पाहिले तेव्हा त्याला कोण आनंद झाला ! गंगामैयाचा जिवंत प्रसाद म्हणून त्याने या बाळाला घरी नेले, चार दिवस खाऊपिऊ घातले. त्याचे मन त्याला स्वस्थ बसून देईना. म्हणून त्यानेच मुलाच्या आईचा शोध केला. आणि मूल परत आईच्या ओटी घातले. ती सद्‌बद्धी त्याला झाली नसती तर लालबहादुर त्या शेतकऱ्याच्या झोपडीतच वाढले असते. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या पसरलेल्या प्रचंड देशाचा हा पंतप्रधान होणार आहे असे त्या वेळी कळते तर शेतकऱ्याने त्यांना कधीच परत केले नसते. हा विलक्षण योगायोग आणि परमेश्वरी संकेतच म्हणावा लागेल.

नि:स्वार्थी वृत्ती हा शास्त्रीजींच्या व्यक्तित्त्वाचा एक विशेष आहे. उत्तर प्रदेशचे गृहमंत्री असताना त्यांना स्वत:ला राहण्यासाठी घर नव्हते. म्हणून 'बेघर गृहमंत्री' असे त्यांना म्हणत. मंत्रिपदावर असताना, आणि नंतरही, पंतप्रधान झाल्यावर, अत्यंत काटेकोरपणे वागण्याकडे शास्त्रीजींचा कटाक्ष असे. त्यांच्या निवासस्थानाचे विजेचे बिल ५०० रुपये झाले असा आक्षेप घेतला गेला. ताबडतोब सर्व बिल स्वत:च्या खाजगी पैशातून त्यांनी भरले. याहून अधिक स्वच्छ आचार तो कोणता ?

दैनंदिन कार्यक्रमांतही शास्त्रीजी अत्यंत वक्तशीर असत. पहाटे पाच ते साडेपाच प्रातर्विधी. पावणेसहापर्यंत पूजा, आरती वगैरे. नंतर एक तासभर प्रार्थना. गीतापाठ व सूतकताई. सात वाजल्यापासून सार्वजनिक कार्याला सुरुवात. त्यांचे दार उघडण्याआधीच त्यांना भेटावयास येणारे विविध प्रकाचे लोक खोळंबून असत. भेटीचा हा कार्यक्रम दहापर्यंत चाले. नंतर भोजन तेही साधेच, संपूर्ण शाकाहारी भोजन. भोजनोत्तर नेहमीची कामे संसद, कार्यालय वगैरे. एव्हाना सायंकाळचे साडेपाच होतात. संध्याकाळी त्यांच्या निवासस्थानासमोरील हिरवळीवर ते लोकांच्या गाठीभेटी घेत. या वेळी प्रत्येकाची प्रथम खाण्यापिण्याची चौकशी ते करत. नंतर कामाबद्दल

बोलत. या बोलण्याच्या वेळेस त्यांची शतपावली चालूच असायची. सायंकाळच्या या दरबारात अनेक प्रकारचे लोक असत. सर्वांना महामंत्र्यांना भेटण्याची मुभा असे. कोणताही अडसर नाही. गोरगरीबही त्यांना त्या वेळी भेटू शकत. हा कार्यक्रम आठ साडेआठपर्यंत चाले. नंतर अल्पसा आहार आणि पुन्हा बारा–साडेबारापर्यंत काम! असा शास्त्रीजींचा दिनक्रम असे.

सर्वांना समान वागणूक देऊन आपण सर्वांत मिसळणे हे शास्त्रीजींच्या स्वभावातच होते. लहान मुलांच्या एका समारंभाचे निमंत्रण त्यांनी स्वीकारले. तेव्हा भाषण करताना ते म्हणाले, 'मी हे तुमचे निमंत्रण स्वीकारले त्याचे प्रमुख कारण म्हणजे मी तुमच्यासारखा लहान आहे.' आपले पंतप्रधान आपणाएवढेच असल्याचे त्यांच्याच तोंडून ऐकून त्या बालचमूत आनंदाचा कल्लोळ उसळला. आणि मोठ्यांना आपल्या पंतप्रधानांची खुबीदार शैली ऐकून प्रसन्नता वाटली.

असे होते आपले पंतप्रधान लालबहादुर! तृणपात्यासारखे. नम्र पण धारदार. लहान असूनही महान. धीरगंभीर आणि खंबीर. भारतभूमीच्या पालनाची जबाबदारी या तृणपात्यावर आलेली होती.

केवळ १९ महिने त्यांनी देशाचं नेतृत्व केलं. ११ जानेवारी १९६६! पाकिस्तानाच्या पाडावानंतर शास्त्रीजी रशियात ताश्कंद इथं गेले होते. कोसिजिन यांचे आमंत्रण होतं. तिथं समझोता करारावर सह्या होणार होत्या. त्या झाल्या आणि त्याच रात्री शास्त्रीजी पंचत्वात विलीन झाले. जगभर हळहळ झाली. भारत दुःखसागरात बुडाला. "जितके लहान पण तितकेच महान शास्त्रीजी चिरस्मरणीय झाले!"

■ ■ ■

# सुयोग प्रकाशनाची मुलांसाठी अत्यंत उपयुक्त पुस्तके

| | |
|---|---|
| बोधकथा | डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर |
| पंछी बोल बोल | डॉ. म. बा. कुलकर्णी |
| नशीबवान काळू निळू | डॉ. म. बा. कुलकर्णी |
| लालबहादूर शास्त्री | डॉ. न. म. जोशी |
| फत्तेगडचा झुंजार | डॉ. न. म. जोशी |
| गोड गोष्टी मुलांसाठी | अवधूत म्हमाणे |
| देशोदेशीच्या कथा | कविता जपे |
| मजेदार गोष्टी | धनश्री हळबे |
| युगकर्ता सचिन | अनंत मनोहर |
| विक्रमादित्य गावस्कर | अनंत मनोहर |
| कपिल देव | अनंत मनोहर |
| जर्मन जगरनॉट | अनंत मनोहर |
| सर्वांसाठी प्रश्नमंजूषा | केशव फडणीस |
| रानफूल | सौ. शुभांगी भडभडे |
| झोपाळू नगरचे ललित राजे | सौ. शुभांगी भडभडे |
| नंदनवनाची फेरी | शंकर सारडा |
| प्राण्यांच्या कथा | निशा डंके |

संपर्कासाठी पत्ता :

सुयोग प्रकाशन

९८६, सदाशिव पेठ, ज्ञानप्रबोधिनी रस्ता,
पुणे ४११ ०३०. फोन (फॅक्स) - २४४९५५८४